| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ४० वा | शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## लातूर पोलिसांचे 'ऑलआऊट' व 'कोंबिंग ऑपरेशन'
## सहा जणांवर शस्त्र कायद्यान्वये कारवाई
### ११ जणांवर प्रतिबंधात्मक गुन्हे, १२७ सराईत गुन्हेगारांची तपासणी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी लातूर पोलीस दलाच्या वतीने दि. २४ ते २५ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्री अचानकपणे जिल्हाभरात 'ऑलआऊट' व 'कोंबिंग ऑपरेशन' राबविण्यात आले. या व्यापक कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारांमध्ये धास्ती निर्माण झाली असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. सदर मोहिमेत लातूर जिल्हा पोलीस दलातील एकूण ३१ पोलीस अधिकारी, १०६ पोलीस अंमलदार आणि ८८ होमगार्ड हे सहभागी झाले होते.

या ऑपरेशनदरम्यान पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांच्या घरांवर अचानक भेट देऊन त्यांच्या हालचालींची पडताळणी करण्यात





आली. ते सध्या कुठे आहेत, कोणत्या प्रकारचा व्यवसाय करतात, त्यांच्या वर्तनात काही संशयास्पद बदल आहे का याबाबत सखोल चौकशी करण्यात आली. विशेषतः मालमत्तेविषयक गुन्हे करण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींवर लक्ष केंद्रीत करून त्यांना समज देण्यात आली, ज्यामुळे संभाव्य गुन्हे रोखण्यास मोठी मदत झाली.

या मोहिमेदरम्यान ६ जणांवर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांच्या ताब्यातील अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने शस्त्रे बाळगणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले.

मालमत्तेविषयक गुन्हे करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या ११ व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२(क) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यास मदत होणार आहे.

ऑपरेशनअंतर्गत १२७ रेकॉर्डवरील घरफोडी व इतर गुन्ह्यांतील सराईत आरोपींच्या राहत्या घरी भेट देऊन त्यांच्या हालचालींची माहिती घेण्यात आली. तसेच त्यांना भविष्यात कोणतेही समाजविघातक कृत्य न करण्याबाबत समज देण्यात आली.

११० लॉजेस व हॉटेल्सची तपासणी करण्यात आली असून ३० संवेदनशील (मर्मस्थळ) ठिकाणांना भेटी देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात विविध ३१ ठिकाणी नाकाबंदी करून ८२७ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीमुळे संशयित हालचालींवर नियंत्रण ठेवण्यास मदत झाली.

तसेच मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या २२ वाहनचालका विरुद्ध खटले दाखल करण्यात आले आहेत.

लातूर पोलिसांनी राबविलेल्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये स्पष्ट संदेश गेला असून, कायदा व सुव्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. अशा प्रकारच्या 'ऑलआऊट' व 'कोंबिंग ऑपरेशन' पुढेही सातत्याने राबवून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येणार असल्याचे लातूर पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## लातूर जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांसाठी राबविला जाणार 'संयम' उपक्रम
### जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षक प्रशिक्षणविषयी सादरीकरण

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील किशोरवयीन मुलामुलींना व्यसनापासून परावृत्त करणे आणि त्यांच्यात जनजागृती करण्यासाठी 'संयम' उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी विशेष प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे सादरीकरण गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. हा उपक्रम ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था पुणे, रोटरी क्लब लातूर, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि भारतीय स्त्री शक्ती संघटना, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत उपक्रमाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. हा प्रशिक्षण उपक्रम येत्या जून किंवा जुलै महिन्यात आयोजित केला जाणार असून, त्यामध्ये जिल्ह्यातील सुमारे १०० शिक्षक आणि स्वयंसेवक सहभागी होतील. या प्रशिक्षणांतर्गत माध्यमिक शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास, आरोग्य, व्यसनपरावृत्ती, स्वनियमन, लैंगिक दुर्वर्तन, उद्दिष्ट निश्चिती, ताणतणाव व्यवस्थापन आणि पालक जागरूकता यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे सर्व प्रशिक्षित शिक्षक आपल्या शाळेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना हे विषय सविस्तरपणे शिकवतील, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक जीवनमूल्ये आणि व्यसनांबाबत योग्य दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी म्हणाले, महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरेल. ज्ञान प्रबोधिनीच्या संचालिका डॉ. अनघा लवळेकर यांनी रोटरी क्लबकडून या उपक्रमासाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या वतीने कुमुदिनी भार्गव यांनी कार्यक्रमाच्या स्थळ नियोजनाची माहिती दिली. या बैठकीला माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, अश्विनी देशपांडे, मधुकर ढमाले, प्रेमा बाहेती आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

## लातूरसह चार जिल्ह्यांत, कर्नाटकात घरफोडी करणारी सराईत टोळीतील, ३२ गुन्ह्यांतील, कुख्यात मुख्य आरोपी जेरबंद, लाखो रुपयांच्या चोरीचा पर्दाफाश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा तसेच शेजारील धाराशिव, सोलापूर व कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यात मागील दीड ते दोन वर्षांपासून सुरू असलेल्या घरफोडी व चोरीच्या सलग घटना घडत होत्या.बंद घरांचे कुलूप तोडून मौल्यवान दागिने व रोख रक्कम चोरी करणारी ही टोळी अत्यंत चलाख पद्धतीने गुन्हे करीत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र, पोलीस अधीक्षक, अमोल तांबे लातूर यांच्या सूचनांनुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेने राबविलेल्या विशेष कारवाईत या गुन्हेगारी टोळीतील मुख्य व कुख्यात आरोपीस अटक करण्यात यश मिळवले आहे.

पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर (स्थानिक गुन्हे शाखा, लातूर) यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने गुप्त माहितीच्या आधारे दि. २४ एप्रिल २०२६ रोजी उजनी येथील उड्डाणपुलाखाली सापळा रचला. या कारवाईदरम्यान सुनिल (वय २४ वर्षे, रा. सुंभा, ता. जि. धाराशिव) हा रेकॉर्डवरील व फरार आरोपीला पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आले . आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता पथकाने तत्परतेने त्यास पकडले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून - पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी ३ ग्रॅम वजनाची सोन्याची ठुशी रोख रक्कम ५,०००/- असा एकूण ३५,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असून आरोपीस विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने आपल्या साथीदारांसह लातूर, धाराशिव, सोलापूर तसेच कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यात विविध ठिकाणी घरफोडी चोरी केल्याची कबुली दिली. ही टोळी नियोजनबद्ध पद्धतीने वाहनांचा वापर करून रात्रीच्या वेळी बंद घरे हेरून चोरी करत असल्याचे उघड झाले आहे.

तपासाअंती आरोपीविरुद्ध खालीलप्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे

४ लातूर जिल्हा - २८ गुन्हे

भादा, किल्लारी, कासारशिरसी, औसा, लातूर ग्रामीण व इतर पोलीस ठाण्यांमध्ये घरफोडी व चोरीचे अनेक गुन्हे.

४ धाराशिव जिल्हा - ४ गुन्हे

४ सोलापूर जिल्हा - ५ गुन्हे

४ कर्नाटक राज्य (बिदर) - ३ गुन्हे

या प्रमाणे एकूण ३२ गुन्हे दाखल असून पुढील तपासादरम्यान गुन्ह्याच्या संख्येमध्ये वाढ होण्याची तसेच चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत होण्याची शक्यता आहे.

या गुन्ह्यातील आरोपीने त्याच्या इतर साथीदारासह टोळी तयार करून गुन्हे केल्याची कबुली दिली आहे असून त्याच्या टोळी मधील काही आरोपींना या अगोदरच अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशावरून अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस अमलदार माधव बिल्लापटे, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, राजेश कंचे, गणेश साठे, श्रीनिवास जांभळे, शैलेश सुडे, महिला पोलीस अंमलदार अंजली गायकवाड यांचे पथकाने अत्यंत समन्वय व कौशल्य दाखवत ही कारवाई यशस्वी केली.

### प्रभात किरणे

येती जाती संकटे
ती क्षणिक खचू नये
मनात,सोडू नये धीर
लव्हाळी ताठ,
ओसरता पूर तैशीच
मनाने असावे खंबीर
-इंजि. नागनाथ कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## रामेश्वर येथील अखंड हरिनाम सप्ताह व अनुष्ठान यज्ञ सोहळ्यात भाजप नेते आ. कराड आवर्जून सहभागी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सुरु असलेल्या संत श्री गोपाळ बुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा भक्तिमय वातावरणात सुरू असून या सोहळ्यात लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड गुरुवारी आवर्जून सहभागी झाले व यज्ञात आहुती दिली. विश्वधर्मी डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचा शुक्रवारी वास्तुशांती सोहळा होत आहे.

गेल्या ५५ वर्षापासून सुरू असलेला संत श्री गोपाळ बुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह याही वर्षी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात गेल्या १९ एप्रिल पासून सुरू झाला असून याची २६ एप्रिल रोजी ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर



पिंपरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहात शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा सुरू असून सप्ताहात काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, रामायण, हरिपाठ, किर्तन, हरीजागर असे दैनंदिन कार्यक्रम होत आहेत.

अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळ्यात लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड हे गुरुवारी आवर्जून सहभागी झाले सपत्नीक त्यांनी या यज्ञात आहूती दिली. याप्रसंगी कुटुंबीयातील सौ. संजीवनीताई कराड, संत गोपाळबुवा साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, सौ. शुभांगीताई कराड, ऋषिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड त्याचबरोबर ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. तुळशीरामअण्णा कराड, मराठवाडा नेताचे संपादक प्रा. रामेश्वर बद्दर, जिप सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, रेणापूरचे उपसभापती शरद दरेकर, भाजपाचे भागवत सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, साहेबराव मुळे, दिपक वांगसकर, ॲड. दशरथ सरवदे, बालासाहेब कदम, श्रीमंत नागरगोजे, गोविंद मुंडे यांच्यासह ग्रामस्थ भाविक भक्त महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खूद्द उपविभागीय पोलिस अधिकारी पोहोचले विहिरीवर: संवादाने काढला बेंबडेवाडीचा मार्ग, पाणीप्रश्न सुटला

**अहमदपूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील बेंबडेवाडी येथील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा गेल्या महिनाभरापासून सुरू असलेला तीव्र वाद अखेर पोलीस प्रशासनाच्या यशस्वी मध्यस्थीनंतर शांततेत मिटला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले आणि किनगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके यांनी थेट बांधावर जाऊन गावकऱ्यांशी संवाद साधल्यामुळे हा तोडगा निघाला.

येथील एका वैयक्तिक मालकीच्या विहिरीवरून शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये संघर्ष सुरू होता. वाद विकोपाला गेल्याने परिस्थिती स्फोटक बनली होती आणि तहसील कार्यालयावर 'घागर मोर्चा' काढण्याची तयारीही झाली होती. २२ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी रायबोले यांनी स्वतः विहिरीवर जाऊन पाहणी केली. या चर्चेतून एक सामोपचाराचा मार्ग निघाला, ज्यानुसार गावकऱ्यांना पाणी उपलब्ध होणार असून संबंधित शेतकरी त्यांना रस्ताही उपलब्ध करून देणार आहेत.

विहिरीवर तोडगा निघाल्यानंतर गावातील मारुती मंदिरात सर्व ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली. यावेळी गावकऱ्यांनी गावात शांतता राखण्याची शपथ घेतली. कायद्याचा केवळ बडगा न उगारता, संवादातून सामाजिक प्रश्न सोडवल्याबद्दल पोलीस प्रशासनाचे संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्य सरकारच्या लेखी आश्वासनानंतर सरकारी कर्मचाऱ्यांचा संप अखेर स्थगित...

### चिमटा दयाचा



कडक उन्हाळ्यात वीज पूर्वसुचना न देता बंद केली जात आहे !
विचारायचे झाले तर फोन बंद केला जात आहे !!

## दारूबंदी, अतिक्रमणमुक्ती ते जलसंधारण:औशातील सात गावांचा होणार कायापालट, ७ गावांना मुख्यमंत्री देणार भेट

**औसा/प्रतिनिधी :** औसा मतदारसंघातील 'जलसमृद्ध' अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या सात गावांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या गावांना राज्यात 'आदर्श गाव' म्हणून विकसित करण्याचा प्रशासनाचा व लोकप्रतिनिधींचा निर्धार असून, यासंदर्भात २४ एप्रिल रोजी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष आढावा बैठक पार पडली. या बैठकीस आमदार अभिमन्यू पवार आणि जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महत्त्वाकांक्षी योजनेतून तांबरवाडी, दावतपूर, महादेववाडी, फत्तेपूर, पारदेवाडी, कवळी (हि.) व हिप्परगा (क.) या सात गावांचा कायापालट केला जाणार आहे. जलसंधारणाच्या कामांवर विशेष भर देतानाच नाला खोलीकरण, बंधारा दुरुस्ती आणि 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार' योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. यासोबतच सिमेंट रस्ते, पाणीपुरवठा, सौर ऊर्जा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका आणि ओपन जिम यांसारख्या पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे या सर्व गावांमध्ये शंभर टक्के दारूबंदी आणि अतिक्रमणमुक्तीची मोहीम राबवली जाणार आहे.जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांनी प्रत्येक गावाचा सविस्तर विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश सर्व संबंधित विभागांना दिले असून, यासाठी निधीची कमतरता भासू न देण्याची ग्वाही दिली. या कामांचा आढावा घेण्यासाठी जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच या गावांना भेट देणार असल्याची माहिती आमदार पवार यांनी दिली. बैठकीस अति. जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, अति. पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

.तांबरवाडी .दावतपूर.महादेववाडी. फत्तेपूर. पारदेवाडी.क वळी (हि.). हिप्परगा (क.)

.दारूबंदी आणि अतिक्रमणमुक्ती: विकासासोबतच या सातही गावांमध्ये १०० टक्के दारूबंदी लागू करून, अतिक्रमण हटवून सार्वजनिक जागा मोकळ्या करण्याचा धडक निर्णय. .शेती व रोजगार निर्मिती: मुख्यमंत्री पशुधन योजना, रेशीम लागवड आणि लघुउद्योगांना बळ देऊन गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करणार. .पायाभूत सुविधांवर भर: सिमेंट रस्ते, वाढीव वीज क्षमता, दहन-दफनभूमीचा विकास आणि विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक अभ्यासिका उभारण्यावर



प्रशासनाचा भर. .प्रशासनाचे सूक्ष्म नियोजन: जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्येक गावासाठी स्वतंत्र सूक्ष्म आराखडा तयार करण्याचे निर्देश; निधी उपलब्धतेची ग्वाही.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# ट्रम्पने वाचाळ बोलणे सोडावे

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमात जन्माधारित नागरिकत्वावर आधारलेले एक पत्र प्रसिद्ध केले. त्यात भारत आणि चीनचा उल्लेख पृथ्वीवरील नरकयातना देणारी ठिकाणे म्हणून केला होता. या वक्तव्यावर टीका होऊ लागल्यानंतर ट्रम्पने वक्तव्य माघार घेतले वास्तविक ट्रम्प यांनी हे विधान अज्ञानातून केले असून, ते अयोग्य असल्याचे भारताने म्हटले आहे. कॅलिफोर्नियामधील तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांमधील भरती प्रक्रियेवर पत्रात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. 'भारत आणि चीनमधील नागरिक अमेरिकी नोकऱ्या हिरावून घेतात. अमेरिकेतील जन्माधारित नागरिकत्वावर प्रश्न उपस्थित करून येथे जन्माला आलेल्या मुलांना लगेच अमेरिकी नागरिकत्व मिळते. नंतर भारत, चीन किंवा पृथ्वीवरील इतर नरकयातना देणाऱ्या ठिकाणांहून (हेलहोल ऑन द प्लॅनेट) संबंधित कुटुंबे देशात दाखल होतात,' अशी वादग्रस्त टिप्पणी पत्रात केली आहे. यावर जोरदार टीका होऊ लागल्यानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी परिस्थिती सावरून घेतली. 'भारत हा एक महान देश असून, त्याचे नेतृत्व माझे मित्र करीत आहेत,' असे अमेरिकेच्या अध्यक्षांना वाटते, असे म्हटले आहे. वास्तविक अमेरिका हा भारतावर जळणारा देश आहे. भारताची प्रगती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कणखर भुमिका हे पाहवत नाही. भारताने अल्पावधित प्रगती साधली आहे. त्याच प्रमाणे जगातील अनेक राष्ट्राशी संबंध चांगले ठेवले आहेत. भारत जगातील कोणत्याही राष्ट्रावर संकट आले तर धावुन जाणारा देश आहे. मानतेचा विचार समोर ठेवुन वाटचाल करणारा देश आहे. त्यामुळे कोरोणाच्या काळात अनेक देशांना भारतीय बनावटीची लस पुरविली, त्याच प्रमाणे इराणावर अमेरिका व ईस्त्राईल मिळून हल्ला केला या युद्धजन्य स्थितीत जखमी सैन्यावर उपचार करण्यासाठी औषधाचे एक हवाई जहाज इराणला पाठविले. हे केवळ मानवतेच्या दृष्टिने पावुल होते. असे अनेक काम भारत करीत असल्याने भारताचे वजन वेगळे आहे. आजही भारत मैत्रीपुर्ण संबंध ठेवण्यात तयार असताना पाकिस्तान सारखे देश भारताशी वैरपुर्ण वागतात. पाकिस्तानला राष्ट्रनिर्मितीसाठी लाखो रुपये दिले. सतत मदतीचा हात पुढे असताना पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले जाते हे जगाला माहिती आहे. पाकिस्तान हा दहशदवादी पोसणारा देश आहे. दहशदवादी निर्माण करणारा देश आहे. कट्टर दशहदवादी ओसामाबेन लादेन याने अमेरिकेचे वर्ल्ड टावर उद्धस्थ केले. त्यावेळी याच अमेरिकेने पाकिस्तानात घुसून लादेन याला ठार मारले. हे माहिती असताना अविचारी म्हणा किंवा कमी विचाराचे ट्रम्प पाकिस्तानशी मैत्री ठेवत आहेत. धोकेबाज पाकिस्तान आहे हे जगाला माहिती आहे. युनोमध्ये भारताने अनेकदा उघडे पाडले आहे. पाकिस्तानची पोलखोल केली आहे असे असताना अविचारोन पाकिस्तानशी ट्रम्प मैत्री करतात हे योग्य नाही. या मागील धुर्त ट्रम्प यांचा असावा. आज पर्यंत अमेरिकेंने स्वत:च्या भुमिवर युद्ध केले नाही. इतर राष्ट्राची भूमीचा वापर केला आहे. जसे इराण सोबत युद्ध करावायाचे झाले तर इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून लढत आहे. इराणच्या शेजारी राष्ट्राला मदत करणे, त्यांना मोठ्या प्रमाणात कर्ज देणे असे उद्योग करीत आला आहे. आताही भारतावर अंकुश ठेवण्याचा विचाराने पाकिस्तानशी हातमिळविणी करीत असावा. पाकिस्तान असा मोठा देश नाही तो मध्यस्थ करणाऱ्यासारखा! तरी ट्रम्प हा पाकिस्तानच्या पाया पडत आहेत. ट्रम्प यांचे भारताविरोधातील वक्तव्य योग्य नाही. नंतर घाबरून शब्द मागे घेतले गेले. मुळात ट्रम्प यांची भुमिका तशी अमेरिकन नागरिकांना आवडणारी नाही. अमेरिकन नागरिक सुद्ध यांच्या वागण्यास वैतागले असतील. त्यामुळे ट्रम्प अमेरिकन प्रगती करण्यापेक्षा इतराकडे लक्ष देत आहेत. गरज नसताना इराणशी युद्ध सुरू केले. हे युद्ध सात-आठ दिवस चालेल व इराण माघारी घेईल असे वाटत होते. ईराणाला आतून कोणी मदत केली हे कळून येत नाही मात्र एकमहिणा होत आला तरी इराण अमेरिकेला घाबरत नाही. जशास तसे उत्तर देत माघार घेणार नाही असे जाहिर वक्तव्य करीत आहे. याचा अर्थ इराण अजूनही अमेरिकेला पाणी पाजणारा देश आहे असे दिसून येते. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावामुळे अमेरिका दबाब निर्माण करीत आहे. इराणचे जहाज दिसले की, गोळ्या घालण्याचे आदेश दिले आहेत. याचा अर्थ अमेरिका हा मजबुत स्थितीत नाही. द्विधा स्थितीत आहे. कधी पाकिस्तानची मध्यस्थी स्विकारतो तर कधी युद्ध विरामाची वेळ वाढवितो आहे. वास्तविक इराण घाबरला असतात तर त्याने स्वता : होवून बोलणी सुरु केली असती. हल्ला करणाराच युद्ध विरामची भाषा बोलतो तर युद्ध जाच्यावर लादले आहे तो हिंमतले लढत आहे. याचा अर्थ ईराण हा घाबरला नाही तर अमेरिका हा घाबरत आहे. त्याच्याकडील लढण्यासाठी लागणारे साहित्याचा वापराचे साहित्य कमी होत आहेत. मिसाईलची संख्या कमी होत आहे. हजारो नाही तर लाखोंच्या किंमतीचे युद्धजन्य वस्तूचा नाश होताना दिसून येत आहे. त्यामुळे युद्ध संपविणे आवश्यक आहे केवळ पाकिस्तान हा देश देखावा म्हणून मध्यस्थ काम करीत आहे. युद्ध काळात भारताने वटवलेली भुमिका योग्य आहे. कोणतीही प्रतिक्रिया न देता काही जहाज होर्मुझमार्ग भारतात दाखल झाले आहेत. गॅस व इंधनाचे जहाज आलेले आहे. अजूनतरी भारतात इंधनाची मोठी टंचाई भसली नाही. थोडी फार गॅसची टंचाई होताना दिसून येत आहे. त्यामुळे भारताचे नियोजन योग्य आहे हेच ट्रम्प यांना पाहावत नाही म्हणून भारताविषयी अपशब्द वापरत आहेत. दबाब येताच माघारीही घेत आहे. शब्दाला पक्का नसणारे ट्रम्प आहेत, त्याच्या या वागणुकीने जगात युद्ध पेटण्याची शक्यता आहे. हे मोठे संकट निर्माण होण्यात ट्रम्प जबाबदार असणार आहे. या परिस्थितीत काही देश एक वटले असेल तरी अमेरिकचे आडमुठ धोरणाने आगामी संकट कायम दिसून येते. त्यामुळे जगातील सर्व राष्ट्र एक होवून अमेरिकेवर युद्ध थांबविण्यासाठी दबाब निर्माण करण्याची गरज आहे. ट्रम्प यांनी बोलताना तोंड सांभाळून बोलले पाहिजे हे लक्षात ठेवले पाहिजे. वाचाळ बोलणे टाळले पाहिजे.

# रामेश्वर रुई येथे संत श्री गोपाळबुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा संपन्न

## 'वसुधैव कुटुंबकम्' संदेशच जगाला विनाशापासून वाचवेल : विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचा संदेश : विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तुशांती



**लातूर/प्रतिनिधी :** वसुधैव कुटुंबकम्' आणि 'एकम् सत विप्र बहुदा वदन्ति' हा भारतीय संस्कृतीचा संदेश संपूर्ण जगाला विनाशाच्या छायेतून वाचवू शकतो. हाच संदेश देणाऱ्या अद्वितीय विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनातून जगभर शांतता प्रस्थापित करण्यासाठी संत श्री गोपाळ बुवा महाराजांचा अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवशक्ती अनुष्ठान महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे असा संदेश विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी दिला.

विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी मंडळ रामेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तुशांती होम हवन आणि आध्यात्मिक ऊनुष्ठानाच्या माध्यमातून करण्यात आली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शुभार्शीवादाने व एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात या सप्ताहाचे व यज्ञाचे आयोजन करण्यात आले. यावेळी तुळशीराम दा. कराड, कमल राजेखाँ पटेल, दशरथ महाराज कराड, शरद रामकृष्ण पाटील, रामेश्वरचे सरपंच सचिन





मोतीराम कराड आणि राजेश का. कराड उपस्थिती होते.

शिवशक्ती अनुष्ठान महायज्ञ राजेश का. कराड यांनी सपत्नीक केला. यावेळी कलश यात्रा आणि शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गोपाळबुवा मंदिरातून झाली. यावेळी देवीच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. विविध देवतांचे विधीपूर्वक आवाहन करण्यात आले. यानंतर कलश पूजन झाले. या सप्ताहात रविवार पर्यंत धार्मिक कार्यक्रम आणि विधी आयोजित केले आहेत.

विश्वधर्मी प्रा. डॉ.विश्वनाथ दा. कराड यांनी आपल्या संदेशात सांगितले की, आज संपूर्ण जग भीती आणि अनिश्चिततेच्या छायेखाली जगत आहे. एकीकडे जागतिक युद्धाचे गंभीर संकट घोंगावत आहे तर दुसरीकडे भीषण हिंसाचार, रक्तपात, दहशतवाद, समाजाच्या प्रत्येक स्तरावरील हत्या आणि राष्ट्रीय सीमांवरुन सुरू असलेल्या वादांनी संपूर्ण जगाला संशय आणि अविश्वासाच्या अंधारात लोटले आहे. या अस्थिरतेवर एकमेव उपाय म्हणजे परस्पर सामंजस्य आणि वैश्विक बंधुत्वाची भावना वाढवण्यासाठी केलेला प्रामाणिक प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा भागातील रामेश्वर रुई हे गाव यज्ञभूमी म्हणून ओळखले जाते. येथे हिंदू आणि मुस्लिम बांधवांनी मिळून विश्वधर्मी श्री राम रहीम मानवता सेतू, भगवान श्रीराम मंदिर, तथागत गौतम बुद्ध विहार, नूतनीकरण केलेली जामा मशीद आणि हजरत जैनुद्दीन चिश्ती दर्गा सारख्या अनेक उल्लेखनीय वास्तू उभारल्या आहेत. अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रयत्नांमुळे रामेश्वर रुई हे मानवता तीर्थ म्हणून उदयास आले आहे.

डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांनी संदेशात सांगितले की, ''रामेश्वरचे नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. २१ व्या शतकात भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगाला सुख, समाधान व शांतीचा मार्ग दाखवेल. तसेच ज्ञानाचे दालन म्हणून उद्यास येईल.'' या वेळी रामेश्वरच्या पंचक्रोशितील भाविक भक्त आणि माता भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# चाकूर तालुक्यातील आनंद उपसा जलसिंचन संस्थेला राज्यस्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार जाहीर

**लातूर/प्रतिनिधी** :जलसंपदा विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या महात्मा फुले पाणी वापर संस्था अभियान २०२४-२५ मध्ये लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ अंतर्गत असलेल्या आनंद उपसा जलसिंचन पाणी वापर सहकारी संस्था मर्यादित, आनंदवाडी (ता. चाकूर) या संस्थेला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था व्यवस्थापन पुरस्कार जाहीर झाला आहे.

लातूर पाटबंधारे विभाग क्र. २, लातूर अंतर्गत अहमदपूर उपविभागातील चाकूर सिंचन शाखेच्या कार्यक्षेत्रात आनंदवाडी लघु प्रकल्प येतो. या प्रकल्पावरील आनंद उपसा जलसिंचन संस्थेने अभियानांतर्गत ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नामांकन सादर केले होते. राज्यस्तरीय समितीने केलेल्या छाननीनंतर संस्थेचे सिंचन अभिलेख, अद्ययावत व्यवस्थापन आणि कामकाजातील पारदर्शकता पाहून या संस्थेची प्रथम पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागातील पाणी वापर संस्था सक्षम व्हाव्यात, यासाठी महाराष्ट्र राज्याचे सचिव संजय बेलसरे व गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांनी विशेष लक्ष देऊन वेळोवेळी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळेच लातूरच्या संस्थेला हे यश प्राप्त झाले आहे. या यशात मुख्य अभियंता सुनंदा जगताप, अधीक्षक अभियंता रूपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता रो. सु. जगताप आणि उपविभागीय अभियंता (अहमदपूर) यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाचा व प्रोत्साहनाचा मोठा वाटा आहे. संस्थेचे सचिव रामचंद्र शेळके यांनी सिंचन अभिलेख अद्ययावत ठेवणे, कार्यशाळांचे आयोजन करणे आणि अर्जाची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

# संयमी आणि नैतिक जीवनासाठी तथागतांच्या पंचशीलाचे पालन करा- डॉ.संजय गवई



**लातूर/प्रतिनिधी :** तथागत भगवान बुद्धाने संपूर्ण विश्वाला मानवी कल्याणाचा नवा विचार दिला. आपल्या संयमी आणि नैतिक जीवनासाठी तथागतांच्या पंचशीलाचे पालन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील माजी प्राचार्य डॉ.संजय गवई यांनी केले.

नवयुवक जयंती मंडळ, हाडोळी यांच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधनपर व्याख्यान, रॅली, भीम गीत गायन आणि भोजनदान कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष नरहरी चिकटे हे होते तर विचारमंचावर चलो बुद्ध की और अभियानाचे प्रमुख मुख्याध्यापक डी. एस.नरसिंगे, प्रा.बाळासाहेब झरीकर, माजी उपसरपंच सुरेश चाटे, बंडू कांबळे, सोमनाथ चिकटे, प्रकाश झरीकर, बळीराम चिकटे, गोपीनाथ वाघमारे आणि कुमार सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, जगत ज्योती महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करून पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ.संजय गवई म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला तथागतांचा धम्म दिला. आपण गुणवत्तापूर्वक शिक्षण घेतले पाहिजे, प्रत्येक रविवारी बुद्ध विहारात गेले पाहिजे, शिलवान बनले पाहिजे, कौटुंबिक वादविवाद टाळले पाहिजे, आई-वडिलांची सुश्रुषा केली पाहिजे, महिलांना सन्मान दिला पाहिजे, सोशल मीडिया पासून थोडे अलिप्त राहिले पाहिजे, नकारात्मक भावना काढून टाकल्या पाहिजे, स्वतःचे आणि समाजाचे आरोग्य राखले पाहिजे आणि स्त्री-पुरुष समानतेचा अवलंब केला पाहिजे अशा दश:सूत्रीची माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी प्रा.बाळासाहेब झरीकर म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्र निर्माते आहे त्यांच्या विचाराचे संवर्धन आणि संस्कार महत्त्वाचे आहे.

मुख्याध्यापक डी.एस.नरसिंगे झरीकर म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समता स्वीकारून त्याचा अंगीकार केला पाहिजे. संत आणि महापुरुषांच्या विचाराचे आचरण केले पाहिजे. याच कार्यक्रमांमध्ये डॉ.संजय गवई यांचा जन्मदिन सुद्धा उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच संघर्ष चिकटे या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन ग्रंथपाल तुळशीराम चिकटे यांनी केले तर आभार मंगेश चिकटे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सोमनाथ चिकटे, बळीराम चिकटे, ॲड.सुमित नांदेडकर, आनंद चिकटे, ज्ञानोबा चिकटे, माधव चिकटे आणि संघर्ष चिकटे यांनी परिश्रम घेतले.

# कौशल्याच्या बळावर स्वप्नांना दिली यशाची उभारी: मुरबाडच्या वेदिका सुरोशी यांचा प्रेरणादायी उद्योगप्रवास

केंद्र आणि राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेने ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणींच्या पंखांना नवे बळ दिले आहे. याचेच एक जितेजागते उदाहरण म्हणजे ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील खेवरे येथील कु. वेदिका विकास सुरोशी. केवळ पदवीधर असून नोकरीच्या मागे न धावता, आपल्या कौशल्याच्या जोरावर स्वत:चा मसाला आणि पापड निर्मितीचा व्यवसाय यशस्वीपणे उभा करून त्यांनी आजच्या तरुण पिढीसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

वेदिका यांचा प्रवास सोपा नव्हता. शेतीवर आधारित उपजीविका असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या वेदिका यांना आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी काहीतरी ठोस करण्याची ओढ होती. हीच ओढ त्यांना 'महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थे'पर्यत घेऊन गेली. शासनाच्या उद्योजकता जागरूकता कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी जानेवारी २०२१ मध्ये 'पापड, लोणचे व मसाला पावडर बनविणे' या विशेष प्रशिक्षणात सहभाग घेतला. केवळ १० दिवसांच्या या प्रशिक्षणाने त्यांच्यातील सुप्त उद्योजिकेला जागृत केले. प्रशिक्षणादरम्यान मिळालेले उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे धडे त्यांच्यासाठी यशाची गुरुकिल्ली ठरले.

प्रशिक्षण पूर्ण होताच, वेळ न घालवता वेदिका यांनी स्वत:च्या ५० हजार रुपयांच्या भांडवलातून मसाला ग्राइंडिंग युनिटची स्थापना केली. घरगुती चव आणि उच्च दर्जाची गुणवत्ता या जोरावर अल्पावधीतच त्यांच्या मसाला आणि पापड उत्पादनांनी स्थानिक बाजारपेठेत आपली ओळख निर्माण केली. ग्राहकांचा वाढता विश्वास हीच त्यांच्या व्यवसायाची खरी संपत्ती ठरली. आज या व्यवसायातून त्यांना दरमहा सुमारे १५ हजार रुपयांचे शाश्वत उत्पन्न मिळत असून, त्या खऱ्या अर्थाने स्वावलंबी झाल्या आहेत.

वेदिका यांच्या या यशामुळे त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडले आहेत. कधीकाळी मर्यादित उत्पन्नावर अवलंबून असलेले त्यांचे कुटुंब आज त्यांच्या या उद्योगामुळे सावरले आहे. ''कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर स्वप्नांना यशाचा आकार देता येतो,'' हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. केवळ स्वत:पुरता मर्यादित विचार न करता, भविष्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार करून इतर ग्रामीण महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे त्यांचे उदात्त उद्दिष्ट आहे.

शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेचा योग्य लाभ घेऊन स्वबळावर उभ्या राहिलेल्या वेदिका सुरोशी यांची ही यशकथा आज जिल्ह्यातील अनेक महिलांसाठी आणि सुशिक्षित बेरोजगारांसाठी एक दीपस्तंभ ठरत आहे. त्यांच्या या जिद्दीचे आणि मेहनतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सकाळी नाश्त्यात बनवा पोहे रोल, नोट करा कुरकुरीत आणि चविष्ट रेसिपी

भारतीय नाश्त्यातील सर्वात लोकप्रिय पदार्थ म्हटलं की 'पोहे' हे नाव नक्कीच येते. महाराष्ट्रात तर पोहे म्हणजे घरी आलेल्या पाहुण्यांची खास ट्रीट! पण रोजचे तेच साधे पोहे खाऊन कंटाळा आला असेल तर? मग पोह्याचाच एक मजेदार, क्रिस्पी आणि तोंडाला पाणी सुटेल असा नवा अवतार पोहे रोल्स एकदम धमाल करून टाकतील! ही रेसिपी फक्त चविष्टच नाही तर अतिशय हेल्दीही आहे. तेल कमी, भाज्या भरपूर आणि बनवायला फार वेळही लागत नाही. खास करून मुलांना किंवा ऑफिसला जाणाऱ्यांना डब्यात काहीतरी वेगळं द्यायचं असेल तर हा पर्याय एकदम परफेक्ट. दिसायला आकर्षक, खायला मजेदार आणि बनवायला अगदी सोपेअसे हे पोहे रोल्स आजकाल कॅफे, टिफिन सेंटर आणि पार्टी स्नॅक्समध्येही खूप ट्रेंडमध्ये आहेत. साध्या पोह्यांना एका डिशमध्ये बदलून रोलच्या स्वरूपात बनवणं ही एक क्रिएटिव्ह कल्पना आहे. कुरकुरीत बाहेरची लेयर आणि आतमध्ये मसालेदार भाज्यांचा स्वाद एकदम भारी! चहा किंवा नाश्त्यासोबत झटपट खाता येणारी, आणि पाहुणे आल्यावर फटाफट बनवता येणारी ही रेसिपी तुमच्या किचनची शान वाढवेल.

**पोहे रोलसाठी लागणारे साहित्य**

जाडे पोहे – २ कप
बटाटा – २ उकडून मॅश केलेले
हिरवी मिरची – २ बारीक चिरलेली
कांदा – १ बारीक चिरलेला
कोथिंबीर – २ टेबलस्पून
आले-लसूण पेस्ट – १ टीस्पून
हळद – ॱ टीस्पून
गरम मसाला – ॱ टीस्पून
लाल तिखट – १ टीस्पून
लिंबाचा रस – १ टीस्पून
मीठ – चवीनुसार
तांदूळ पीठ किंवा कॉर्नफ्लोअर – २ टेबलस्पून (बाइंडिंगसाठी)
तेल – तळण्यासाठी किंवा शॅलो फ्रायसाठी

कृती

**१. पोहे तयार करून घ्या**

पोहे चाळणीत टाकून हलकं पाणी शिंपडा. खूप पाण्यात भिजवू नका, नाहीतर पोहे मऊ होऊन गिच्च होतील. २-३ मिनिटे तसेच ठेवून द्या.

**२. मिश्रण तयार करा**

मोठ्या भांड्यात भिजलेले पोहे, मॅश केलेले बटाटे, कांदा, हिरवी मिरची, कोथिंबीर, आले-लसूण पेस्ट, तिखट, हळद, गरम मसाला, लिंबाचा रस आणि मीठ घाला.

सगळे साहित्य नीट मिसळा.

मिश्रण जास्त सैल वाटत असेल तर २ टेबलस्पून तांदूळ पीठ किंवा कॉर्नफ्लोअर घाला.

**३. रोल बनवा**

हाताला थोडंसं तेल लावून रोल किंवा सिलिंडरच्या आकाराचे लांबट पोहे रोल तयार करा.

**४. शॅलो फ्राय तळणे**

तव्यावर थोडंसं तेल टाकून रोल्स शॅलो फ्राय करा. दोन्ही बाजूंनी छान गोल्डन ब्राऊन आणि कुरकुरीत होईपर्यत परता. किंवा हवं असल्यास डीप फ्रायही करू शकता.

**सर्व्हिस टिप्स:**

गरमागरम रोल्स टोमॅटो सॉस किंवा मिंट चटणीसोबत सर्व्ह करा. मुलांच्या डब्यात देण्यासाठी रोल्स छोटे-छोटे काप करून बाईट-साइज बनवू शकता. पार्टी स्टार्टर म्हणूनही हा एकदम हिट पर्याय आहे.

# स्फोट झाले; निष्पापांचा जीव गेला तरी दोषी कोणी नाही





मालेगाव स्फोटांनंतर काँग्रेसने 'हिंदू दहशतवाद' हा शब्द प्रयोग वापरला. तो त्यांच्या पतनास कारण ठरला, हा राजकीय भाग वेगळा. अनेक दहशतवादी घटनांत अनेकजण बळी गेले तरीही दोषी किंवा आरोपी कोणीच नाहीत हे गूढ कसे उलगडणार?

मालेगावमध्ये २००६ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील उरलेल्या चार आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द ठरवला. त्यामुळे खटला चालवण्यास आरोपीच शिल्लक राहिले नाहीत. या चौघांची सुटका होईल का? कधी होईल? हे प्रश्न अद्याप बाकी आहेत. ८ सप्टेंबर २००६ रोजी मालेगाव मधील हमिदा मशिदीजवळ व परिसरात चार बॉम्ब स्फोट झाले. त्यात ३१ जण मरण पावले व किमान ३१२ जण जखमी झाले होते. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे गेला. त्यांनी अल्पसंख्याक समाजातील नऊ जणांना अटक करून आरोपपत्रही दाखल केले होते. त्यानंतर हे प्रकरण केंद्रीय गुप्तचर विभागाकडे (सीबीआय) सोपवले गेले. त्यांनी या आरोपींविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले. स्फोटांनतंर सुमारे चार वर्षांनी हे प्रकरण राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए)सोपवले गेले. त्यांनी नवे आरोपी शोधले. ते बहुसंख्याक समाजातील आहेत. याच चार जणांविरुद्ध आरोप निश्चित करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. तपासाच्या काळात सीबीआयने हैदराबादमध्ये स्वामी असीमानंद नामक व्यक्तीस अटक केली. हैदराबादमधील व अन्य स्फोटांत त्यांचा हात असल्याचा संशय होता.

**यंत्रणांचे अपयश**–असीमानंद यांनी कबुलीजबाब दिल्याचे तेव्हा जाहीर झाले होते; पण नंतर तो दडपणाखाली घेतल्याचा दावा करत त्यांनी तो मागे घेतला. त्या नंतर एनआयएने मनोहर राम सिंग नरवारिया, राजेंद्र चौधरी, धन शिव सिंग आणि लोकेश गोपाल किश्शन शर्मा या चौघांना अटक करून हत्या व गुन्हेगारी स्वरूपाचे कारस्थान आणि बेकायदा कृत्ये प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली आरोपपत्र दाखल केले. आधी अटक केलेल्या नऊ जणांची २०१६ मध्ये विशेष न्यायालयाने सुटका केली. उपरोक्त चौघांना उच्च न्यायालयाने २०१९ मध्ये जामीन मंजूर केला. २०२५ मध्ये विशेष न्यायालयाने त्यांच्यावर आरोप निश्चित केले. त्यास या चार जणांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. आरोपींनी गुन्हा केल्याचे बघणारा कोणीही साक्षीदार नाही, जो कबुलीजबाब कोणत्याही न्यायालयाने ग्राह्य धरला नाही. तो आरोप निश्चित करण्याचा आधार ठरू शकत नाही; हा बचाव पक्षाचा मुख्य युक्तिवाद होता. तो उच्च न्यायालयाने मान्य केला असावा. 'हस्तक्षेप' झाल्याचे सकृद्दर्शनी आढळल्याचे कारण देत उच्च न्यायालयाने खटल्याचे कामकाज जानेवारीत थांबवले होते. हस्तक्षेप कोणाचा, कशात झाला? यांची उत्तरे समाजास मिळाली पाहिजेत. आधीचे नऊ जण व नंतरचे चार जण यांनी स्फोट घडवले नसतील तर ते कोणी घडवले? अनेकांच्या मृत्यूस जबाबदार कोण? हे प्रश्न कायम राहिले आहेत. पहिल्या घटनेनंतर मालेगावात २९ सप्टेंबर २००८ मध्ये पुन्हा स्फोट झाले. त्या वेळी भाजपच्या तत्कालीन खासदार प्रज्ञा सिंग व तत्कालीन लेफ्टनंट कर्नल पुरोहित यांची नावे आरोपींच्या यादीत असल्याने या खटल्यास मोठी प्रसिद्धी मिळाली. गेल्या वर्षी सर्व सातही आरोपी निर्दोष ठरले. गुजरातमधील दंगलीच्या काळात ग्राम नरोदा या छोट्या गावात अल्पसंख्याक समाजाच्या काही जणांना जिवंत जाळण्यात आले होते. त्या खटल्यातूनही भाजपच्या तेव्हाच्या मंत्री माया कोदनानी यांच्यासह सर्व ६७ आरोपी निर्दोष ठरले. २००६ मध्ये मुंबईत उपनगरी रेल्वे गाड्यांत स्फोट झाले आणि अनेकांचे बळी गेले. त्यातील आरोपीही गेल्या वर्षी सुटले. 'आरोपींनी गुन्हा केला हे सिद्ध करण्यात तपास यंत्रणांना अपयश आले' हा सर्व निकालांमधला मुख्य मुद्दा होता. या तपास संस्थांनी कशाच्या आधारावर 'संशयित' आरोपींना अटक केली, आरोपपत्र दाखल केले? त्यांच्या विरुद्धचे आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत तर मग या संस्थांनी कशाचा व काय 'तपास' केला? या संस्थांची कार्यक्षमता तसेच त्यांचा तपासामागचा हेतू यावरच प्रश्नचिन्ह उमटले आहे. या सर्व घटनांमध्ये जे बळी गेले त्यांना तपास यंत्रणांच्या अपयशामुळे न्याय मिळाला नाही हे सत्य उरले आहे.

# भारतीय राजकारणात महिलांचे अत्यल्प प्रमाण

समृद्धी धायगुडे

८ मार्चला प्रत्येक क्षेत्रात महिला कशा सक्रिय आहेत, हे गोडवे गाण्यात जातो. पण या विषयावर खरे तर विस्तृत विचार करण्याची गरज आहे. महिला आरक्षणाच्या निमित्ताने भारता सारख्या सर्वांत मोठ्या लोकशाही असलेल्या देशात प्रत्यक्षात किती प्रमाणत महिला नेतृत्व आहे, हे पारखून बघण्याची गरज आहे. किती शैक्षणिक संस्था किंवा आर्थिक संस्थानमध्ये, प्रसार माध्यमांमध्ये मोठ्या पदावर किती प्रमाणात स्त्रिया उच्च पदस्थ आहेत ? हे नेमके प्रमाण तपासण्याची गरज दिसत आहे. संसदेत ज्यावेळी सुद्धा मूतींसारखी खासदार प्रश्न मांडते त्यावेळेला निश्चितच वेगळे कंगोरे किंवा त्या मुद्द्याची दुसरी बाजू देखील लक्षात येते. संसदेत महिलांचे प्रमाण वाढले मग ते कोणत्याही पक्षाचे असो यामुळे देशातील संवेदनशील आणि संस्कारक्षम निर्णय घेण्यास नक्कीच मदत होईल, असे एक महिला म्हणून वाटते.

भारतीय लोकशाहीत महिलांची लोकसंख्या जवळपास ५०% आहे, परंतु संसदेत त्यांचे प्रतिनिधित्व अजूनही १५% च्या खालीच आहे. नुकत्याच झालेल्या राजकीय घडामोडी आणि काही विश्लेषक यांच्या मतानुसार भारतीय राजकारणातून स्त्रिया 'गायब' असण्यामागे काही खोलवर रुजलेली सामाजिक आणि राजकीय कारणे आहेत.

१. महिला राजकारणात का दिसत नाहीत? याचे काही प्रमुख अडथळे आपण आधी बघू.

पितृसत्ताक मानसिकता : आजही समाजात राजकारण हे 'पुरुषांचे क्षेत्र' मानले जाते. घरातील निर्णय घेण्यापासून ते बाहेरच्या जगात नेतृत्व करण्यापर्यंत पुरुषांनाच प्राधान्य दिले जाते. यामुळे महिलांना घरच्यांकडून पाठिंबा मिळणे कठीण होते. पुरुषी मानसिकतेत बदल हा केवळ पुरुषांचा अजेंडा नसून त्यासाठी महिलांनी देखील प्रयत्न करणे आवश्यक आहे. याची सुरुवात बालपणापासून करणे आवश्यक असते. जोवर 'मेल प्रेफरन्स प्रायोरिटी' स्त्री-पुरुष दोघांच्या मनातून जात नाही तोवर ही वाट खडतरच आहे.



## कारणे आणि आरक्षणाची गरज

राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि हिंसा : राजकारणात वाढलेली गुंडगिरी, पैसा आणि बाहुबली संस्कृती यामुळे महिला या क्षेत्रापासून दूर राहणे पसंत करतात. महिलांसाठी हे वातावरण असुरक्षित आणि आव्हानात्मक वाटते.

कौटुंबिक जबाबदाऱ्या (ऊेंलश्रश ईीवशप) : नोकरी असो वा राजकारण, घरची जबाबदारी आजही प्रामुख्याने महिलांवरच असते. राजकारणात लागणारा वेळ आणि फिरस्ती यामुळे घर आणि राजकारण यांचा ताळमेळ घालणे कठीण जाते.

पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव : राजकीय पक्ष सभेमध्ये महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारतात, पण प्रत्यक्ष निवडणुकांमध्ये उमेदवारी देताना मात्र 'निवडून येण्याची क्षमता' (थळपपरलळश्रळीूं) या नावाखाली पुरुषांनाच प्राधान्य दिले जाते.

२. महिला आरक्षण विधेयक (थोशप ठशीशीींरींळेप इळश्रश्र) : नुकतेच संसदेत मांडलेले 'महिला आरक्षण विधेयक' हा एक आशेचा किरण म्हणायला हरकत नाही. बऱ्याच प्रतीक्षेनंतर केंद्र सरकारने 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (१०६ वी घटनादुरुस्ती) संमत केले. या विधेयकाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे:

३३% आरक्षण : लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३% जागा राखीव ठेवल्या जातील.

निर्णय प्रक्रियेत सहभाग : जेव्हा महिला धोरण ठरवणाऱ्या सभागृहात असतील, तेव्हा महिलांच्या आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षिततेशी संबंधित कायद्यांवर अधिक संवेदनशीलतेने काम होईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा अनुभव : पंचायत राज आणि नगरपालिकांमध्ये आधीच आरक्षण असल्याने ग्रामीण भागात 'सरपंच पती' ही संकल्पना असली तरी, बऱ्याच महिलांनी उत्तम नेतृत्व सिद्ध केले आहे. तोच बदल आता राष्ट्रीय स्तरावर अपेक्षित आहे. नुकत्याच एका ओटीटीवर या संदर्भात एक विनोदी सिरीज पण आलेली सर्वांनी पहिली असेल. त्यात देखील काही वर्षांपूर्वी पर्यंत 'सरपंच पती' हे स्वयंघोषित पद मिरवणारे नग आपल्याला दिसतात. हे का दिसतात कारण महिला सरपंच तिचे अस्तित्व तिची निर्णय क्षमता दाखवण्यास कमी पडते.

३. आरक्षणासमोरील आव्हाने आणि अंमलबजावणीतील अडथळे

३३ टक्के आरक्षण विधेयक पारित झाले असले तरी, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी दोन महत्त्वाच्या अटी घालण्यात आल्या आहेत :

- जनगणना (उशपीीी) : कोरोनामुळे लांबणीवर पडलेली जनगणना पूर्ण होणे आवश्यक आहे.
- मतदारसंघांची पुनर्रचना (ऊशश्रळाळ-ीींळेप) : जनगणनेनंतर मतदारसंघांची सीमा निश्चित केली जाईल, त्यानंतरच हे आरक्षण लागू होईल.

या अटींमुळे महिलांना प्रत्यक्ष आरक्षण मिळण्यासाठी २०२९ ची निवडणूक उजाडू शकते, यावर अनेक विश्लेषकांनी टीका केली आहे. केवळ आरक्षण देऊन महिलांचे प्रश्न सुटणार नाहीत. जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही आणि राजकीय पक्ष स्वेच्छेने महिलांना संधी देत नाहीत, तोपर्यंत खरा बदल घडणार नाही. मात्र, महिला आरक्षण विधेयक ही एक सुरुवात आहे, ज्यामुळे किमान ३३% महिलांना संसदेत हक्काची जागा मिळेल आणि भारतीय लोकशाही अधिक सर्वसमावेशक होईल.अर्थात, हे विधेयक लागू झाल्यानंतर १५ वर्षांसाठी असेल आणि त्यानंतर संसद त्याचा आढावा घेऊन मुदत वाढवू शकते.

# आयुष्यात आनंदी राहण्यासाठी



मनातून द्वेष काढून टाकणे, इतरांशी तुलना न करणे आणि वर्तमान क्षणात जगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सकारात्मक विचार, व्यायामाची सवय आणि आवडीच्या गोष्टींसाठी वेळ काढल्याने मानसिक आरोग्य सुधारते आणि नैसर्गिकरित्या आनंद वाढतो. आनंदी राहण्यासाठी काही **सोप्या मराठी टिप्स**

**:नकारात्मकता दूर करा**: मनातील द्वेष, राग आणि मत्सर सोडून द्या. यामुळे मानसिक शांतता मिळते.तुलना करणे थांबवा: स्वतःची तुलना इतरांशी करू नका. प्रत्येकाचे आयुष्य वेगळे असते.**वर्तमान क्षणात जगा:** भूतकाळाचे दुःख आणि भविष्याची काळजी करणे सोडून द्या.व्यायाम आणि योग: दररोज व्यायाम केल्याने हॅपी हार्मोन्स (एपर्वोहिळपी) वाढतात आणि ताण कमी होतो. कृतज्ञता **व्यक्त करा:** आपल्याकडे जे काही आहे, त्यासाठी देवाचे किंवा परिस्थितीचे आभार माना.**छंद जोपासा:** तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी (वाचन, संगीत, प्रवास) करण्यासाठी वेळ काढा.चांगली **झोप घ्या:** दररोज ७-८ तासांची शांत झोप शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहे. **प्रेमाचे नाते:** कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा, त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोला. नियमित **स्वतःवर प्रेम करा** आणि छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद घ्या.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



खरंतर ही अत्यंत सकारात्मक बाब आहे, असे मला वाटते. सध्या अनेक सामाजिक संस्थांनी मासिक पाळीविषयी जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मासिक पाळीविषयीचे समाजातील गैरसमज दूर होत आहेत. **–नितेश गावकर, कल्याण.** मासिक पाळी हा महिलांच्या आयुष्यातील नैसर्गिक भाग आहे. मासिक पाळी हे निसर्गाने महिलांना दिलेले एक वरदान आहे. इंटरनेटमुळे मासिक पाळीविषयीची माहिती सध्याच्या काळात सहज उपलब्ध आहे. त्याचबरोबर जाहिराती आणि चित्रपटामुळे मासिक पाळीविषयीची जनजागृती होत

## २ Joke — विनोद





**गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?**

**शिष्य : असत्यवादी.**

**गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?**

**शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.**

## ३ Message — संदेश




Doctor: aapke pati ko zyaada rest ki zaroorat hai. yeh sleeping tablets leejiye.

Wife: unko yeh kab dena hai doctor?

Doctor: yeh unke liye nahi, aapke liye hai

## ४ Thought — सुविचार



माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे ते माझे म्हणा.
– अज्ञात

**संस्कृत सुभाषित**


**अतिक्रान्तं हि यत्कार्यं पश्चाचिंतयते नर:**
**तच्चास्य न भवेत्कार्यं चिंतया च विनश्यति**

(कर्णपर्व, अध्याय ३१, ेक २९ महाभारत)

**अर्थ :** घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार

कोड क्र. ९०



## आडवे शब्द

१. '---- मोरया, मंगलमूर्ती श्री गणराया' (लता मंगेशकर)
१०. मासा पकडण्याचे साधन
११. किंमत
१२. अभिनव
१४. एक रंगीत कंदमूळ
१५. दणकट, मजबूत
१७. विद्युल्लता
१८. पुळका, गहिवर, मूळ अर्थ झरा
१९. पुष्पदल
२१. रसाळ
२३. नवरा, पती
२५. सीतेच्या जुळ्या मुलातील एक
२६. काव, तांबडी माती
२८. सारखा
३१. एक छोटे चर्मवाद्य
३३. रणक्षेत्र
३६. अंत:करण
३८. पुष्कळ
४०. चित्रपटाचे संवाद
४१. पाठविलेला
४२. कलावंत
४५. शरीर
४६. आरोप
४७. निष्ठूर, दया नसलेला
४९. सबब
५०. पू.विनोबाजींनी लिहिलेले गीतेचे मराठी अनुवादित ेक
५२. सावली, प्रतिबिंब
५३. तात्पर्य
५६. एक श्वासरोग
५७. अजगर
५८. तंतोतंत जुळणारे
६०. आपला-परका अशी भावना
६३. दृष्टी, दृष्ट
६५. अति उंचीची दोन झाडे
६७. अटीची भाषा
६९. मुस्लिम प्रार्थना पद्धत
७१. पत्र
७३. लोकर, लव (इंग्रजी)
७४. शिजविलेले तांदूळ
७५. नूतन
७७. मस्ती, जोम
७८. घरोघरी पूर्वी मातीच्या असायच्या
८०. अर्धी ओंजळ
८२. सुका, वाळलेला
८४. न घडवलेले, न रूळलेले
८५. कहाणीतील गाव
८६. गुरांचे खाद्य

## उभे शब्द

१. ऐटदार चालीची स्त्री
२. पोलिस
३. गर्भाचे पोषण करणारी
४. तारण
५. मीठ
६. विधानसभेचा सदस्य
७. नमनीय
८. खूप लांब (अंतरावर)
९. जनतेचा कल आणि कौल
१३. खस
१५. फुलाची प्रथमावस्था
१६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
१८. पार्वतीला शंकराने दिलेले नाव
२०. उन्हाचे तुकडे
२२. लाकडी जिना
२४. कोळिष्टक
२७. आईची वहीनी
२९. झकास
३०. अनुमती
३२. सडेतोड बोलणारा
३४. सुसर
३५. मुक्या प्राण्यांवरील प्रेम
३७. नकला करणारा
३८. रामबंधु
३९. मज्जाव, बंदी
४०. पाडाव, ऱ्हास
४३. कपडालत्ता
४४. हे दिवस ऋण काढून साजरे करू नयेत
४६. जननी, जन्म देणारी
४७. कीव, करुणा
४८. अत्यंत खालच्या दर्जाचा
५१. दिनांक
५३. वस्तू, माल
५४. अील, बीभत्य- ---- विचकट
५५. धन्यवादाचा शब्द
५७. नाविक दल
५९. वेल
६०. आमचा (बंगाली)
६१. चित्रपट
६२. मायभूमी, जमीन
६४. लोक, प्रजा
६६. छोटा डफ
६८. रविवासर
७०. जगन्माता
७२. पवित्र, शुद्ध
७६. तोटी
७८. उजेडासाठी पेटवलेली गवत इ.ची जुडी
७९. स्तुती करणारा
८१. लहान
८३. कावळा

## आडवे उत्तर

१.गजानना श्री गणराया आधी वंदू तुज १०.गळ ११.दर १२.नवा १४.गाजर १५.कणखर १७.दामिनी १८.उमाळा १९.पाकळी २१.रसदार २३.यजमान २५.लव २६.काव २८.सम ३१.डफ ३३.समरभूमी ३६.मन ३८.भरमसाट ४०.पटकथा ४१.रवाना ४२.कलाकार ४५.तन ४६.आळ ४७.दयाहीन ४९.कारण ५०.गीताई ५२.पडछाया ५३.सार ५६.दमा ५७.आर ५८.चपखल ६०.आपपरभाव ६३.नजर ६५.ताडमाड ६७.जरतर ६९.नमाज ७१.टपाल ७३.फर ७४.भात ७५.नवीन ७७.रग ७८.चुली ८०.पसा ८२.वाळका ८४.अनघड ८५.आटपाटनगर ८६.कडबा

## उभे उत्तर

१.गजगामिनी २.नगरपाल ३.नाळ ४.गहाण ५.रामरस ६.आमदार ७.वंदनीय ८.दूर ९.जनमानस १३.वाळा १५.कळी १६.खरवस १८.उमा २०.कवडसा २२.दादर २४.जळमट २७.मामी २९.मस्त ३०.पवानगी ३२.फटकळ ३४.मगर ३५.भूतदया ३७.नकलाकार ३८.भरत ३९.मना ४०.पतन ४३.कापडचोपड ४४.सणवार ४६.आई ४७.दया ४८.हीन ५१.तारीख ५३.सामान सामान ५४.अचकट ५५.आभार ५७.आरमार ५९.लता ६०.आमार ६१.रजतपट ६२.वतन ६४.जन ६६.डफली ६८.रविवार ७०.जगदंबा ७२.पावन ७६.नळ ७८.चुड ७९.भाट ८१.सान ८३.काक




# ओ मेरी आँखों का तारा है तू

राजभूषण सहस्रबुद्धे (९८२२२०६०२६)

चंदा है तू मेरा सूरज है तू
ओ मेरी आँखों का तारा है तू
जीती हूँ मै बस तुझे देखकर
इस टुटे दिल का सहारा है तू
जिससे बंधी हर आशा मेरी
मेरा वो सपना सलौना है तू

आराधना(१९६९) चित्रपटातील लता मंगेशकर यांचं हे गीत. मुलगाच आपल्या जीवनाचा अंतिम सहारा असल्याचं मानणार्या एकल आईचं हे आश्वस्त प्रतिपादन; पण ज्यांना मुलगा नाही मुलगी अपत्य आहे. त्या असंख्य मातांचे काय? याचे उत्तर म्हणजे जॉर्डनची राजधानी अम्मान मधील नवल या स्त्रीच्या संघर्षाची अतिशय रोमांचक कहाणी असलेल्या खछडकअङङअक अ इजध (२०२३) हा चित्रपट पाहिल्यावर मिळते.




अदनान आणि नवल हे सर्वसाधारण परंतु, सुखी जोडपे. अदनान एक वाहतुकीचा टेम्पो चालवतो. नवल वृद्धांच्या सेवासुश्रुषेचे काम करते. एका रात्री नवल पतीला नवीन मुलगा जन्माला घालण्यास प्रयत्न करण्यास विनविते; पण तो थकल्याचे कारण दर्शवून झोपी जातो. तीच त्याची काळनिद्रा ठरते. नवलची ८ वर्षांची मुलगी नोरा अनाथ होतेच; पण नवलच्या आयुष्यात रोज नवनवीन समस्या तिचा पिच्छा करू लागतात.

अदनानने त्याच्या भावाकडून हफ्त्यावर त्याचा टेम्पो विकत घेत-लेला असतो, पण त्याचे चार महिन्यांचे हफ्ते थकलेत, याची नव-लला कल्पना नसते. टेम्पो विकायचा नाही यासाठी ती अडून बसते. पण फ्लॅटची खरेदी तिच्या पगारातून आणि वडिलांनी दिलेल्या दागिन्यांच्या आधारावर केलेली असली तरी त्याचा कोणताच पुरावा तिच्याकडे नाही आणि नवलला मुलगा नसल्यामुळे जॉर्डनच्या पितृसत्ताक कायद्यांनी ती एकटीच पतीच्या संपत्तीची वारस बनू शकत नाही. तर दीर, नणंदा देखील तितक्याच वारसदार ठरणार असतात. म्हणून दीर घरावर आणि गाडीवर आपला हक्क मिळवण्यासाठी नवलवर दावा ठोकतो.

नवल एका श्रीमंत ख्रिश्चन कुटुंबात वृद्धेची रात्री उशिरापर्यंत सेवाशुश्रुषा करण्याचे काम करते. तेथील सहकारी हसन तिच्याप्रती प्रामाणिक सहानुभूती ठेवून असतो. त्याच्या प्रस्तावाचा विचार करण्याची देखील तिला फुरसत नसते. कारण आता तिच्या केवळ जगण्याचाच नाही तर, अस्तित्वाचाही प्रश्न निर्माण झालेला असतो.

यावर उपाय म्हणून कोर्टात नवल खोटाच जवाब देते की ती गर्भवती आहे आणि काही दिवसांची मुदतवाढ मिळवते; पण हा काही कायमस्वरूपी तोडगा नसतो. कधी ना कधी सत्य बाहेर येणारच. याचवेळी नवरा बाहेरख्याली असल्यामुळे ख्रिश्चन मालकिणीची बंडखोर मुलगी लौरीन (तिचा बापही तसाच असूनही आईने संसार मोडला नसतानाही) माहेरी राहायला येते आणि ती गर्भवती असल्याची चाहूल लागताच नवल तिला विनंती करते की, नवलच्या नावाने तिने गर्भवतीची वैद्यकीय चाचणी करावी. जेणेकरून ती कोर्टात पुरावा सादर करेल; पण लौरीन अट घालते की, नवलने तिच्या गर्भपाताची व्यवस्था करावी. जे जॉर्डनमध्ये बेकायदेशीर आहे. मग, एका आडनिड्या जागेतील एका डॉक्टरकडून नवल स्वतः गर्भवती असल्याचा दाखला घेते. आणि लौरीनचाही गर्भपात घडवून आणते.

पण, इतके सोपे कसे असेल जीवन..? कोर्टात खासगी डॉक्टरचा दाखला अमान्य, तो सरकारी दवाखान्यातूनच मिळवला पाहिजे. लौरीनचे बिंग फुटल्याने तिचा नवरा तिला घरी नेऊन मारहाण करून परत माहेरी धाडतो. त्यामुळे तिची चिडलेली आई नव-लला कामावरून काढत बेकायदेशीर कामाला प्रोत्साहन दिल्याबद्दल तुरुंगाची हवा खायला लावण्याची भीती घालते. त्यात नवलला टेम्पो चालवता येत नसताना, बरेच दिवस वाट अडवतोय म्हणून तो हलवण्याचा सोसायटीतील लोकांचा तगादा. तिकडे हसनची लग्नासाठी भूणभूण, तर येता जाता विधवा बघून लोकांच्या अश्लील टिपण्णया, इशार्यांचा वैताग. आणि घरी आल्यावर घरात उंदरांचा उच्छाद. रात्री नवर्याच्या फोनवर सतत महिलांचे ब्लँक कॉल्सचा ससेमिरा तर, चार महिने नवरा कामावर गेलाच नव्हता याचे गूढ मेंदूचा भुगा करतेय. हे सर्व कमी म्हणून, एकदा विधवा नवल सहकारी हसनच्या गाडीतून घरी परतलेली बघून दीर तिच्या चारित्र्यावर शंका घेऊन कोर्टामार्फत नोराचाही ताबा घेऊ पाहतो.

आता नोकरी गेली, घर-गाडी गमावणार आणि आता मुलीचाही ताबा जाणार या सर्व संकटांपुढे ही नारी कुठं-कुठं आणि कशी कशी पुरी पडणार? त्यातून स्वत्व टिकवून कशी मार्ग काढते ते दाखवण्यासाठी अमजद अल् रशीद या नवोदीत दिग्दर्शकाने पदार्पणातील कलाकृतीत आपले पूर्ण कसब पणाला ला-वलेय. पती निधनानंतर स्त्रीचे जीवन किती बदलून जाते. याची पटकथेत छोट्या छोट्या प्रसंगांनी अतिशय बारकाव्यांसहीत गुंफण केली आहे. नवल परिस्थितीने किती हताश झालीय, गांजली आहे, दीराचे घरात जबरदस्ती घुसणे, कायद्याचा वैयक्तिक आयुष्यातील प्रभाव, नवर्याच्या प्रतारणेची पोल खोलणे यांची घरातील वावरणार्या पिटुकल्या उंदराशी सांगड घालून कल्पकता सिद्ध केली आहे.

घर राखणे म्हणजेच सुरक्षेची सुनिश्चिती, आणि खोटं गर्भारपण त्यातही भ्रूण मुलगाच हे दर्शवताना स्त्रीचे अस्तित्व किती गौण आहे. हे अधोरेखित होते तर, शेवटच्या दृश्यात ती टेम्पो स्वतः चालवून पार्क करते. हे दृष्य म्हणजे भविष्याची सूत्रे स्वतःच्या हातात घेऊन तिने सामाजिक स्वातंत्र्याची पताका फडकवण्यासारखेच.अमजद यांच्या मजबूत, वेगवान पटकथेला नवलची भूमिका करणार्या मोना हव्वा या नावाजलेल्या पलेस्टीनी अभिनेत्रीच्या अभिनयाने सोन्याहून पिवळे अन् मौल्यवान केले आहे. तिची देहबोली, भावमुद्रा प्रेक्षकांनाच काय कॅमेर्यालाही खिळवून ठेवते. त्यामुळेच तो तिला सोडून दुसर्या पात्रांवर फारसा जातच नाही. त्यामुळे पूर्वी हुकलेले अनेक पुरस्कार यावेळी तिने हक्काने मिळवलेत. त्याबद्दल तिचे कौतुक करावे तितके कमीच. कान्समध्ये प्रवेश मिळवून पुरस्कारही मिळवणारा जॉर्डनचा हा पहिला चित्रपट विविध महोत्सवात अजूनही आमंत्रित होत, पुरस्कार मिळवत आहे. जॉर्डनतर्फे आस्करसाठीही पाठवण्यात आला होता.अमजदने पदार्पणातीलच अतिशय उत्कंठावर्धक कलाकृतीतून हा मोठा सामाजिक प्रश्न समाजापुढे मांडून नवीन वैचारिक मंथनास चालना दिली आहे. त्याच्या कल्पकतेची चुणूक २०१६च्या त्याच्या 'ढहश झर्ीीं' या पहिल्या लघुपटावेळीच दिसली होती. तेव्हा त्याला 'भावी अरब तारा' अशी ओळख मिळाली होती. ती त्याने ८ वर्षांनी बनवलेल्या या पहिल्या चित्रपटातून सार्थ ठरवली.

जेव्हापासूनचा मानव इतिहास मान-वाला ज्ञात झाला आहे. तेव्हापासून विश्वाच्या प्रत्येक संस्कृतीत पुरुष-सत्ताक जीवन पद्धतीच सर्वत्र पहायला मिळते. म्हणजेच, कमी अधिक प्रमाणात स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आल्याचे दिसून येते. ती शारीरिक दृष्ट्या, मानसिक दृष्ट्या पुरुषापेक्षा कमजोर आहे. अशा अपप्रचारात स्त्रीजातीच्या कितीतरी पिढ्या स्वतः होरपळल्याच आणि इतरांचे जी-वनाची राख करण्यात सहभागी देखील झाल्या, हे दुर्दैवी आहे.त्यामुळेच आजही कित्येक समाजात स्त्रीला 'केवळ मूल जन्माला घालायचे यंत्र' हाच दर्जा दिला गेलेला पहायला मिळतो. (अर्थात भारतीय वेद पुराण काळाचे संदर्भ अपवाद ठरतात) शिवाय ते मूल पुरुष जातीचे असेल तरच कौतुक आणि स्त्री जातीचे असेल तर, दर्जा अजून घसरण्याची शक्यता. जरी विज्ञानाने यास पुरुषच जबाबदार असतो हे सिद्ध झाले असले तरीही.

ज्या संस्कृतीत १४०० वर्षांपूर्वीच्या प्रथा परंपरा धार्मिक बंधनांचा बागुलबुवा दाखवून २१ व्या शतकातही पाळल्या जातात. तेथे पुरुषाला सोयीस्कर तेवढे आधुनिक बदल स्वीकारून, धर्मग्रंथांचे दाखले देऊन स्त्रीजीवनाचे शोषण मनसोक्तपणे चालूच आहे. स्त्रीसाठी खोटे बोलणे, बाहेरख्यालीपणा पाप, पण पुरुषाला सर्व माफ. परंतु अशा प्रतिगामी विचारधारेच्या प्रतिकूल वातावरणा-तही काही स्त्रिया आपल्या मानवी हक्कांसाठी पूर्ण शक्तिनिशी लढत आ-हेत.

तरी, बरे मुस्लिम देशांत जॉर्डन शैक्षणिक, वैज्ञानिक, स्वास्थ्य सुविधा, कला, क्रीडा यात सर्वांत जास्त प्रगत आहे. सभोवतालच्या सर्व शरणार्थी लोंढ्यांना उदारतेने सामावून घेत अल्पसंख्यांकांनाही समान स्वातंत्र्य देत आहे. असे असले तरी, पितृसत्ताक व्यवस्थेतील जाचक अटी शर्तींमुळे सामान्य मुस्लिम नवल असो की उच्चभ्रू ख्रिश्चन लौरीन या दोघ-ींचा सामाजिक स्तर त्यांची दयनीय अवस्था टाळू शकत नाही. याचाच अर्थ स्त्रीचे दमन सार्वत्रिक आहे. पुरुष म्हणून जन्माला येणे अथवा पुरुष मुल जन्माला घालणे हेच श्रेष्ठ आहे. याची टोचणी जीवनभर स्त्रीला देण्याची ही व्यवस्था खूपच अन्यायकारक आहे आणि हा भेदभाव विश्वातून पूर्णतः हद्दपार होईल तोच खरा सुदिन.

**जहाँ मानते बेटा चिराग समान**
**रौशन करता है नाम खानदान**
**वहीं बेटी भी तो ज्योति समान**
**चमका देती है जमीं आसमान**

## आयकॉन नाही.. मी अजूनही, नवाजुद्दीन यांच्या साधेपणाने जिंकली मनं

गेल्या काही वर्षांत नवाजुद्दीन सिद्दीकी यांनी विविध आणि वेगळ्या प्रकारच्या भूमिकांमधून आपली खास ओळख निर्माण केली आहे. तरीही ते स्वतःवर पूर्ण समाधान न मानता सतत सुधारणा आणि प्रगती करण्यावर भर देतात.



अमृता यादव

बॉलिवूडमध्ये अनेकदा मोठ्या प्रतिमा, स्टारडम आणि पदव्यांवरून कलाकारांची ओळख ठरते. अशा वाता-वरणात नवाजुद्दीन सिद्दीकी आपल्या साधेपणामुळे आणि जमिनीवर राहण्याच्या दृष्टिकोनामुळे वेगळे ठरतात.'गँग्स ऑफ वासेपुर', 'मांझी – द माउंटन मॅन', 'बजरंगी भाईजान' आणि 'ठाकरे' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या प्रभावी अभिनयामुळे त्यांना त्यांच्या पिढीतील सर्वात ताकदीच्या कलाकारांपैकी एक मानले जाते.इतकी यशस्वी कारकीर्द असूनही नवाजुद्दीन सिद्दीकी स्वतःला आयकॉन मानायला तयार ना-हीत. ते अजूनही स्वतःला शिकणारा कलाकार मानतात आणि मी अजून चांगला अभिनेता व्हायचं आहे असा त्यांचा नम्र दृष्टिकोन कायम आहे. त्यांच्या या साधेपणामुळे चाहत्यांमध्ये त्यांच्याविषयीचा आदर अधिक वाढला आहे. मी स्वतःला कोणताही आयकॉन मानत नाही. मी अजून अभिनेता झालेलोच नाही, मी अजूनही शिकतो आहे, सतत पुढे जात आहे, असे त्यांनी आपल्या प्रवासाबद्दल सांगितले. नवाजुद्दीन यांच्यासाठी अभिनय ही एखादी अंतिम मंजिल नसून सतत चालणारी प्रक्रिया आहे, ज्यासाठी संयम, शिस्त आणि नेहमीच अधिक चांगले करण्याची जिद्द आवश्यक असते.हीच त्यांची नम्रता त्यांना लोकांच्या नजरेत महान बनवते. भावनांची अंतर्गत तीव्रता असो किंवा सहज वास्तववाद-नवाजुद्दीन सिद्दीकी यांनी प्रत्येक भूमिकेसोबत अभिनयाची एक वेगळी उंची गाठली आहे, जिथे प्रत्येक पात्र एक शाळेसारखे वाटते.

ते पुढे म्हणाले, एक चांगला अभिनेता होणे ही आयुष्यभराची साधना आहे आणि त्यासाठी एक संपूर्ण आयुष्यही कमी पडते. त्यांच्या या विचारांमधून आजच्या काळात एक महत्त्वाचा संदेश मिळतो, जिथे झटपट प्रसिद्धी अनेकदा समर्पणावर मात करते.खऱ्या कलेचा गाभा हा सतत स्वतःला बदलण्यात आणि अधिक परिपूर्ण बनण्यात आहे, हे ते अधोरेखित करतात.

पहिल्यांदाच रोमँटिक भूमिकेत झळकणार स्नेहल शिदम, 'इन्स्पेक्टर मंजू'च्या नव्या प्रोमोला प्रेक्षकांची पसंती; कथेत नवा ट्विस्ट

गेल्या काही वर्षांत नवाजुद्दीन सिद्दीकी यांनी विविध आणि वेगळ्या प्रकारच्या भूमिकांमधून आपली खास ओळख निर्माण केली आहे. तरीही ते स्वतःवर पूर्ण समाधान न मानता सतत सुधारणा आणि प्रगती करण्यावर भर देतात.'दबंग' स्टाइल एन्ट्रीने सलमान खानने पुन्हा वेधलं लक्ष, नव्या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात; चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण त्यांच्या मते, प्रत्येक भूमिका ही नवीन काहीतरी शिकण्याची, जुन्या गोष्टी विसरण्याची आणि स्वतःच्या मर्यादा ओलांडण्याची संधी असते.




## राजा शिवाजी मधील अफझलखानाची भेट आणि जोरदार टीकास्त्र

राजा शिव-ाजी मधील अफझलखानाची भेट आणि जोरदार टीकास्त्र; रितेशने नेमकं दाखवलं आहे तरी काय ?

मुंबई :

छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे दैवत, राजांच्या अनेक गोष्टी प्रत्येक मराठी माणूस हा लहानपणापासून ऐकत आला आहे, सुरुवातीला आलेल्या राजा शिवछत्रपती या सिनेमामुळे महाराजांचे शौर्य, कर्तृत्व आपल्याला अधिक कळले, त्यानंतर थेट मी शिवाजी राजे भोसले बोलतोय या सिनेमामुळे मराठी माणसाचं रक्त खवळल. यानंतर अनेक सिनेमे आले, महाराजांच्या वेगवेळ्या बाजू, युद्धनीती, गनिमी कावा यांवर प्रकाश टाकला गेला.आता महाराजांचा आणखीन एक सिनेमा येत आहे. रितेश देशमुख यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणारा बहुप्रतीक्षित चित्रपट मराजा शिवाजीफ, या चित्रपटाचा ट्रेलर २० एप्रिल रोजी प्रदर्शित झाला असून एका प्रसंगामुळे अनेक टीका, आरोप होत आहेत.मुंबई : राज्यातील चित्रपट, दूरदर्शन मालिका व जाहिरातींच्या चित्रीकरणास कोणताही अडथळा न आणता कोल्हापूर चित्रनगरी तसेच कर्जत येथील एन. डी. स्टुडिओ ...या प्रसंगामुळे झाला वाद राजा शिवाजी या सिनेमात अनेक कलाकारांनी यात महत्वाच्या भूमिका साकारल्या असून. संजय दत्त हा अफझलखान ची भूमिका साकारली आहे.अफझलखान वधाचा तो प्रसंग : रितेश देशमुखच्या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये शिवाजी महाराज आणि अफझलखान यांची भेट होते.

अफझलखान हल्ला करण्यापूर्वीच महाराज त्याला वाघनख दाखवतात आणि वार त्याच्या मानेवर करतात.मराठमोळा रॅपर रॉक्सनच्या गाण्यांची हिप-हॉपमध्ये क्रेझ

मुंबई: महाराष्ट्राच्या हिप-हॉप क्षेत्रात उदयास आलेला तरुण आणि दमदार आवाज म्हणजे रॉकसन. आपल्या प्रभावी गीतलेखन आणि वास्तववादी मांडणीमुळे रॉक्सनने ...मूळ इतिहासात काय सांगितले आहे

इतिहास जो आपण वाचत आल-ोय त्यावरून महाराजांवर आधी अफझलखानवर वार केला त्यांना मिठी मारून खाकेत दाबले, महाराजांवर आधी अफझलखानाने वार केले , चिलखत होते म्हणून महाराज बचावले त्यानंतर महाराजांनी वाघनखांनी वार करून अफझलखानाच पोट फाडलं.

टीकेची झोड-हा ट्रेलर लाँच होताच सोशल मीडियावर टीकेची झोड उठले आहेत, इतिहास रितेश देशमुख का बदलत आहेत? इतिहासाशी छेडछाड का करत आहेत? आणि चुकीचा इतिहास लोकांना का दाखवत आहेत? महाराष्ट्राच्या इतिहासाचा, वारशाचा आणि अभिमानाचा का अपमान करत आहेत? असे प्रश्न विचारले जात आहेत.

रितेश देशमुख यांचे उत्तर-रितेश देशमुखने सोशल मीडियाच्या माध्यमातून या टीकांचे उत्तर देत लिहिलं आहे की मप्लीज १ मे रोजी चित्रपट नक्की पहा... तुमच्या प्रश्नच उत्तर चित्रपटाचं आहे, मला आशा आहे की, तुम्ही तुमचे मित्र आणि कुटुंबासोबत चित्रपटाचं आनंद घ्याल. जय शिवराय



## दबंग स्टाइल एन्ट्रीने सलमान खानने पुन्हा वेधलं लक्ष

'चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

'मातृभूमी' नंतर सलमान खानने त्याच्या नवीन प्रोजेक्टची घोषणा केली आहे. या चित्रपटात सलमान खानसोबत नयनतारा मुख्य भूमिकेत आहे.अभिनेता सलमान खान सध्या त्याच्या 'मातृभूमी' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. दरम्यान, त्याने दुसऱ्या एका प्रोजेक्टवर काम सुरू केले आहे. वामशी पैडीपल्ली दिग्दर्शित या चित्रपटाच्या चित्रीकरणाला नुकतीच सुरुवात झाली आहे. या चित्रपटात सलमान खानसोबत नयनतारा मुख्य भूमिकेत आहे. आज, शुक्रवारी, सलमान खानने चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली. सुपरस्टारने विचारायला हवं, म्हणून ईदची घोषणा केली काळजी करू नका,

या चित्रपटाबद्दलही योग्य वेळी सांगू थोडा संयम ठेवा माझ्यासारखंच तुम्हालाही वाट पाहावी लागेल तुमची जी अवस्था आहे तीच माझीही आहे

सलमान खानचा चित्रपट म्हणजे फक्त एक सिनेमा नसतो, तर तो एक उत्सव असतो. आणि तोही ईदच्या निमित्ताने असेल, तर तो संपूर्ण देशासाठी आनंदाचा सोहळा ठरतो. अनेक वर्षांपासून सलमानने ईद हा सण जणू आपल्या नावा-वरच केला आहे. क्शन, भावना, संगीत आणि जबरदस्त लोकाभिमुखता यांचा संगम असलेले त्यांचे चित्रपट प्रेक्षकांना नेहमीच भावले आहेत. 'वॉन्टेड', 'दबंग', 'बॉडीगार्ड', 'एक था टायगर', 'किक', 'बजरंगी भाईजान', 'सुलतान' आणि 'भारत' अशा चित्रपटांनी ईदच्या काळात मोठे यश मिळवले आहे.

अधिकृतपणे ईद २०२७ साठी आपल्या पुढील चित्रपटाची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली असून गेल्या दशकभरापासून हिंदी चित्रपटसृष्टीला आकार देणारी परंपरा पुन्हा एकदा ताजी झाली आहे.

या नव्या चित्रपटाचे सध्या 'एसव्हीसी ६३' असे नाव ठेवण्यात आले असून त्याचे दिग्दर्शन वंशी पैदीपल्ली करत आ-हेत. या चित्रपटात नयनतारा दिसणार असून निर्मिती दिल राजू करत आ-हेत. समाजमाध्यमांवर माहिती देताना सलमानने लिहिले, थोडं पुढचं विचारायला हवं...

सलमान खान हा हिंदी चित्रपटसृष्टीतील पहिला अभिनेते ठरला, ज्याच्या सलग १७ चित्रपटांनी शंभर कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली आणि बॉक्स ऑफिसचे मापदंडच बदलून टाकले. त्याच्या नावावर दोनशे कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई करणारे अनेक चित्रपट आहेत, तसेच 'बजरंगी भाईजान' आणि 'सुलतान' सारख्या चित्रपटांनी तीनशे कोटींचाही टप्पा पार केला आहे.

## रणवीर- दीपिका पादुकोन दुसऱ्यांदा होणार आई बाबा

मुंबई :

दीपिकाच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे, धुरंधरबाबत नाही, कोणत्या नवीन सिनेमाची नाही तर, दीपिका पुन्हा आई होण-ार असून सिंग परिवारात पून्हा एका आनंदाचे क्षण येणार आहेत.अभिनेत्री दीपिका पदुकोणने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात काही न बोलता एका फोटोनेच समजलं आहे, की दुआ मोठी ताई होणार आहे. दीपिकाने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी सर्वांना दिली. पोस्ट मधील फोटो मध्ये दुआ दिसते आहे आणि दुआच्या हातात प्रेग्नेंसी टेस्ट किट आहे, जे पॉजिटीव्ह आहे. या पोस्ट वर कौतुकाचा वर्षाव होत असून अनेकांनी या जोडीचे अभिनंदन केले आहे. फॅन्स आणि अनेक सेलिब्रिटींनी मिळून शुभेच्छांचा वर्षाव करत आ-हेत.दीपिकाला या आधी एक गोंडस मुलगी असून तिचा जन्म दुआ चा जन्म २०२४ मध्ये झाला. आणि आता दीड वर्षांनी दुसऱ्या बाळाचं पालकत्व स्वीकारण्यासाठी दीपिका आणि रणवीर सज्ज झाले आ-हेत. मध्यंतरी दीपिका पदुकोण रणवीरच्या कोणत्याच सिनेमाच्या प्रमोशनला येत नाही या मुद्दा वाऱ्यासारखा पसरला होता. तिच्यावर लोकांनी टीका केल्या होत्या धुरंधर गाजतोय रेकॉर्ड मोडतोय पण दीपिका यात कुठेच दिसत नव्हती. आज दु-सरी प्रेग्नन्सी जाहीर करून टीका करणाऱ्या लोकांना



कदाचित ती प्रमोशनला का जात नव्हती याच कारण दाखवल आहे.आधी डेटिंग मग २०१८ मध्ये लग्न आणि २०२४ मध्ये दुआ , आता नवीन पाहुणा कोण असणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत

# केंद्रात आणि राज्यात सत्ता परिवर्तन झाले, खरा विकास काय असतो हे दाखवून दिले

## कारेपूर सय्यदपुर आनंदवाडी रस्त्यांच्या भूमिपूजन प्रसंगी आ. रमेशअप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी :** लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यानंतर रेणापूर तालुका पोरका झाला होता. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या कार्यकाळात विकास शोधावा लागत होता मात्र केंद्रात, राज्यात परिवर्तन झाले आणि ग्रामीण भागात खरा विकास काय असतो हे विविध योजनेच्या माध्यमातून भाजपाच्या नेतृत्वातील सरकारने दाखवून दिले असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

केंद्रीय निधी योजनेअंतर्गत रेणापूर तालुक्यातील कारेपुर सय्यदपूर धवेली कवठाळी आनंदवाडी ते राज्य रस्ता दरम्यानच्या २५ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते गुरुवारी सायंकाळी मौजे सय्यदपुर येथे झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते बळीराम चप्पे हे होते. याप्रसंगी माजी आमदार त्रिंबकनाना भिसे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, रेणापूर पंस सभापती सौ. मोनिका सुर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई अकनगिरे, जिप सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, पंस सदस्या सौ. अंजली काळे, सौ. शितल राऊतराव भाजपाचे ओमप्रकाश गोडभरले, भागवत सोट, अनिल भिसे, सुरज शिंदे, सुकेश भंडारे, ॲड. दशरथ सरवदे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कारेपूर ते आनंदवाडी या दरम्यानच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने जनतेच्या मागणीमुळे केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडून निधी उपलब्ध करून रस्त्याच्या कामाचा आज प्रत्यक्षात शुभारंभ होतोय, तेही अठरा फुटाचा डांबरीकरणाचा रस्ता दर्जेदार होत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस वाल्यांनी मुरूमाचे एकही टोपलं टाकलं नाही. काँग्रेसच्या काळात विकासाची कामे शोधावी लागत होती मात्र शासनाच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात मोठ्या प्रमाणात विकास कामासाठी निधी आणण्यात यश आले याचे मोठे समाधान आहे.

आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मिळालेल्या आमदारकीचा उपयोग गोरगरीब माणसाच्या मदतीसाठी, प्रगतीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी करता येत असल्याचे हे माझे भाग्य आहे. असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, भाजपा सरकारच्या कार्यकाळात वैयक्तिक योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ देण्याचे काम होत आहे. काँग्रेसच्या काळात दहा पाच गावाला घरकुल मिळत होते मात्र आज शेकडो घरकुले मंजूर होत आहे. लमान तांड्याचे रूप बदलून गेले आहे. एकही लाडकी बहीण योजनेपासून वंचित राहणार नाही काहींच्या असलेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू असे बोलून दाखवले.

गावोगाव शेत रस्त्याचा प्रश्न गंभीर असून सर्व पाणंद आणि शेत रस्ते मजबूत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. लातूर ग्रामीण मतदार संघातील पहिल्या टप्प्यात रेणापूर तालुक्यात सव्वाशे, लातूर तालुका पावने दोनशे आणि भादा सर्कल मध्ये चाळीस किलोमीटर रस्त्याचे दर्जेदार काम हाती घेतले असून दोन वर्षात एकही शेत रस्ता शिल्लक राहणार नाही. सदरील रस्त्यावर असलेली अतिक्रमणे स्वतःहून काढून घेऊन रस्ते मोकळे करावे. कायदेशीर कारवाई करण्यास शासनाला भाग पडू नये असे सांगून मतदारसंघात साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे. सय्यदपूर येथील हनुमान आणि वाल्मिकी मंदिरासमोर सभागृहाच बांधकाम येत्या काळात करण्यात येईल अशी ग्वाही आ. कराड यांनी दिली.

या कार्यक्रमात विविध विकास कामासाठी निधी खेचून आणणारे आणि सतत सर्वसामान्यांसाठी उपलब्ध असणारे आमदार एकमेव रमेशआप्पा आहेत असे सांगून माजी आमदार त्रिंबकनाना भिसे म्हणाले की मिनी मंत्रालय जिल्हा परिषद पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात असल्याने आता विकास कामाला कसलीही अडचण येणार नाही असे बोलून दाखवले तर अनिल भिसे यांनी मतदार संघातील विकासाला गती देण्याची काम रमेशआप्पांनी केल्याचे सांगितले. सभापती मोनिका सूर्यवंशी यांनी आ. कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर पंचायत समिती विकासाचे वेगळे मॉडेल तयार करेल असे बोलून दाखवले तर उपसभापती शरद दरेकर यांनी १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत तब्बल चार कोटीचा निधी मंजूर झाला असून या निधीतून गावागावात विविध विकास कामे केली जाणार असल्याची माहिती दिली. प्रारंभी प्रस्ताविकातून महेंद्र गोडभरले यांनी भूमिपूजन होत असलेल्या रस्त्याची माहिती देऊन येत्या काळात आ. कराड यांच्या हस्ते अनेक विकास कामाचा शुभारंभ होणार असल्याचे बोलून दाखवले.

प्रारंभी आ. कराड यांचे रेणापूर तालुका भाजपा, विविध सरपंच, सय्यदपूर आणि परिसरातील विविध ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करून स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी मोहन बुड्डे यांनी उपस्थितांचे आभार मानले. आ. कराड यांचे



सय्यदपुर गावात आगमन होताच महिला भजनी मंडळींनी भक्तिमय आणि उत्साहाच्या वातावरणात जोरदार स्वागत केले.

या कार्यक्रमास रमाकांत फुलारी, सुरेश बुड्डे, सिद्धेश्वर मामडगे, अशोक राठोड, परमेश्वर दंडे, निवृत्ती चिद्रे, ओम चव्हाण, नामदेव बोंबडे, सुनिल चेवले, प्रल्हाद पोटे, दयानंद बाणापुरे, सुंदर फुले, रविंद्र नागरगोजे, किशन शिरसागर, दगडूसाहेब पुरी, चांदभाई शेख, नंदकुमार वल्लमपल्ले, राजेंद्र काळे, प्रताप राऊतराव, मनोहर पाटील, दिलीप बरुरे, पांडुरंग कलूरे, श्रीमंत नागरगोजे, लक्ष्मण खलंग्रे, सुनील बुड्डे, अजित चप्पे, सोमनाथ मिटकरी, सूर्यकांत बुड्डे, आनंदा माळगे, अनिकेत बुड्डे, प्रल्हाद पोटे, विजय चिंते, ओम चप्पे, गुरुनाथ चिंतलवाड, रतन पेटलवाड, वसंत बुड्डे, बाबुराव कस्तुरे, नानासाहेब चव्हाण, काशिनाथ मोरे, किशन कोते, दत्ता बड्डे यांच्यासह सय्यदपूर, खरोळा, कारेपूर, धवेली, आनंदवाडी, कवठळी, रामवाडी, तळणी, मोहगाव इतर अनेक गावातील सरपंच चेअरमन ग्रामस्थ महिला पुरुष भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हाकेतांडा शाळेत 'जागतिक वसुंधरा दिन' निमित्त भव्य स्वच्छता व जनजागृती अभियान



**हाकेतांडा/प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हाकेतांडा ता.रेणापूर जि.लातूर येथे 'जागतिक वसुंधरा दिन' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, सुरेंद्र गोडभरले, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव,रेणापूर तालुका गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया,शिक्षण विस्तार अधिकारी सुदर्शन लहाने यांच्या सूचनेनुसार शाळा परिसर व गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदान केले.

कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वीमातेच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वच्छता रॅली काढून ''स्वच्छ गाव सुंदर गाव'', ''वृक्ष लावा, पृथ्वी वाचवा'' अशा घोषणा देत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. अनेक विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक भाषणे व घोषवाक्ये सादर करून उपस्थितांना विचार करायला भाग पाडले.श्रमदान उपक्रमात शाळा परिसरातील कचरा गोळा करणे, प्लास्टिक मुक्ती अभियान, झाडांच्या परिसराची साफसफाई अशा विविध कामांचा समावेश होता. ग्रामस्थांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांसोबत हातभार लावला.

या प्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत ''आजची स्वच्छता ही उद्याच्या निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे'' असे सांगितले. विद्यार्थ्यांनीही स्वच्छता राखण्याचा व पर्यावरण जपण्याचा संकल्प केला.तसेच शाळेचे मुख्याध्यापक गणेश सावळकर, जाकीर शेख , बालाजी सावळकर यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून, स्वच्छता आणि हरित उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. तांड्यात सकरात्मक बदलाची सुरुवात झाली याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष त्र्यंबक राठोड, अंबादास राठोड, ,काशिनाथ राठोड, शिवाजी चव्हाण, विश्वनाथ राठोड, योगेश जाधव, हरिचंद्र राठोड, राजकुमार राठोड, मीरा राठोड, सुमनबाई राठोड, इत्यादीनी परिश्रम घेतले या उपक्रमाबद्दल रेणापूर केंद्राचे केंद्रप्रमुख गोविंद चौधरी,केंद्रीय मुख्याध्यापक गोपाळ पडिले, शिक्षण विस्तार अधिकारी संजय देशपांडे, यांनी कौतुक केले.

## रेणापूर शहर काँग्रेसची नवी कार्यकारिणी जाहीर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर शहर काँग्रेसची नवीन कार्यकारिणी शहराध्यक्ष श्री. नितीन मोटेगावकर यांनी जाहीर केली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. नव्या कार्यकारिणीत अनुभवी व युवा नेतृत्वाचा समतोल साधण्यात आल्याने पक्षाची विचारधारा अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.

नूतन कार्यकारिणी सर्वसमावेशक असून सर्व घटकांना सोबत घेऊन काँग्रेस पक्षाची ताकद रेणापूर शहरात अधिक मजबूत करेल. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून संघटनात्मक बांधणी, बूथस्तरावर कार्यकर्त्यांचे जाळे अधिक मजबूत करणे तसेच जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

शहरातील नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी ही कार्यकारिणी सक्रियपणे कार्य करेल आणि पक्षाच्या धोरणांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहोचवेल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सर्व नूतन कार्यकारिणी सदस्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी धिरज विलासराव देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रेणापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष नितीन मोटेगावकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, जिल्हा परिषद काँग्रेस गटनेत्या सौ आशाताई भिसे, रेणापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रमोद कापसे, लातुर ग्रामीण युवक काँग्रेसचे अध्यक्ष विश्वजीत पाटील,जेष्ठ कार्यकर्ते पंडीत माने,मा.सभापती प्रदीप राठोड,गटनेते गजेंद्र चव्हाण, नगरसेवक सचिन मोटेगावकर,पदम पाटील,आदींची उपस्थिती होती.

## कराड च्या पवित्र भूमीत : सोलापूरच्या सुवर्ण समाज रत्नांचा गौरव

**सोलापूर/प्रतिनिधी :** कराड येथील प्रतिष्ठित दिगंबर काशिनाथ पालकर सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा सन २०२६ चा समाजरत्न पुरस्कार सोलापूर मधील समाज सेवेतील अग्रगण्य व्यक्तिमत्वाना दि. १८ एप्रिल रोजी श्री. आनंदराव पाटील माजी उपाध्यक्ष कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे हस्ते कराड येथे प्रदान करण्यात आला. अध्यक्ष स्थानी कृष्णा विश्व विद्यापीठ कराडचे कुलपती डॉ. सुरेशराव जी भोसले बाबा, आणि ग्रामीण साहित्यिक बबनराव पोतदार पुणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कराड येथील दि. का. पालकर प्रतिष्ठान ही संस्था कार्याध्यक्ष श्री. आनंदराव पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात दिपस्तंभासारखे कार्य करत आहे. समाजातील खऱ्या धुरीणांना शोधून त्यांच्या कार्याला बळ देण्याचे पवित्र कार्य हे प्रतिष्ठान गेली एकवीस वर्षांपासून करत आले आहे. श्री. आनंदराव पालकर यांच्या कल्पक नेतृत्वामुळेच या संस्थेने समाज कार्याचा एक नवा आदर्श निर्माण केला असून अशा प्रतिष्ठित संस्थेकडून गौरव होणे हे कोणत्याही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आणि सन्मानाचे आहे.

दि. का. पालकर शिक्षण संस्था ही गेली सत्याहत्तर वर्षांपासून कार्यरत असून सदर संस्थेचे नांव सातारा जिल्ह्यात आदराने गौरविले जाते. दिगंबर पालकर यांच्या निधनानंतर त्यांच्या पुण्यस्मृती दिनानिमित्त समाजातील खऱ्या समाज धुरीणांना शोधून त्यांच्या कार्याला बळ देण्याचे पवित्र कार्य हे प्रतिष्ठान सातत्याने करत आले आहे . निःस्वार्थी सेवा, पारदर्शकता आणि समाजाप्रती असलेली अतूट निष्ठा ही या प्रतिष्ठान ची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. सोलापूर च्या सोनार समाजाचे नेतृत्व करणाऱ्या आणि संत नरहरी महाराज मंदिर परंपरेचे जतन करणाऱ्या चार मान्यवरांचा एका दिमाखदार सोहळ्यात सन्मान करण्यात आला.

पुरस्कार्थी मान्यवर

१ श्री. वसंत पोतदार अध्यक्ष, सोनार समाज संस्था, सोलापूर. २ श्री. भारत कारीकर, माजी अध्यक्ष व विध्यमान जेष्ठ विश्वस्त, संत नरहरी महाराज मंदिर समिती पंढरपूर. ३ श्री. मोहन मंद्रूपकर, उपाध्यक्ष संत नरहरी महाराज मंदिर समिती पंढरपूर. ४ श्री. संजय आष्टीकर, कार्यवाहक संत नरहरी महाराज मंदिर समिती पंढरपूर. कराड येथे आयोजित या सोहोळ्यात मान्यवरांचे हस्ते सन्मान पत्र , सन्मान चिन्ह, शाल, बुके देऊन या चौघाना गौरविण्यात आले. समाजहित, मंदिर व्यवस्थापन आणि वारकरी सांप्रदायाचा प्रचार, प्रसार यामधील त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. चौघा पुरस्कार्थिंच्या वतीने वसंत पोतदार यांनी पालकर प्रतिष्ठान ने दिलेला हा सन्मान आम्हां सर्वासाठी केवळ एक गौरव नसून, समाज सेवेच्या प्रवासात अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा आहे. या प्रेरणेबद्दल मी सर्वांचे आभार मानतो असे म्हणाले. या गौरव सोहळ्यासाठी सोलापूर हुन सोनार समाज संस्थेचे अग्रणी प्रवर्तक श्री. संजयजी मैंदर्गीकर, श्री. कालिका नागरी सहकारी पत संस्थेचे चेअरमन श्री. अमोल दीक्षित, व्हॉइस चेअरमन श्री प्रकाश तपासे, लोकल ऑडिटर श्रीं. प्रकाश कांबळे यांनी आवर्जून उपस्थित राहून पुरस्कार्थिंचा उत्साह वाढवला.या पुरस्कार सोहळ्याबद्दल संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून समाज बांधवाकडून चौघाचेही अभिनंदन होत आहे.

## येणाऱ्या काळात 'यासाठी' भाजप आंदोलन करणार – प्रेरणा होनराव

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सतत महिलांचा हक्क डावलण्याचे काम केले आहे. काँग्रेसने महिला आरक्षण धोरणास विरोध केल्याने येणाऱ्या काळात या विषयाला धरून भाजप तीव्र आंदोलन करणार असल्याचे प्रतिपादन भाजपा प्रदेश प्रतिनिधी तथा लातूर शहर महानगरपालिकेच्या सदस्या प्रेरणा होनराव यांनी शुक्रवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारी शक्ती वंदन अर्थात महिला आरक्षण विधेयक मंजूर करून घेण्यासाठी तीन दिवसांचे संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले होते. या अधिवेशनात काँग्रेसने या विधेयकास विरोध दर्शवला. परिणामतः हे विधेयक फेटाळले गेले. संसदेत या विधेयकाबाबत चालू असलेली चर्चा आपण प्रेक्षक गॅलरीत बसून पाहिली , ऐकली असल्याचे सांगून प्रेरणा होनराव म्हणाल्या की, हे विधेयक फेटाळले गेले तो दिवस असंख्य महिला भगिनींच्या दृष्टीने काळा दिवस ठरला. या विधेयकास काँग्रेसच्या प्रियांका गांधी यांनी विरोध दर्शविला . लोकसभेचे विरोधी पक्षनेते असणाऱ्या राहुल गांधी यांनी तर या विधेयकाबद्दल ब्र शब्दही उच्चारला नाही. त्यांनी उलट आपल्या बालपणीच्या आठवणीना उजाळा देण्याचे काम केले. तर राज्यातील महिला काँग्रेस खासदारांनी या आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे बोलून दाखविल्याचे ऐकून आपणास आश्चर्य वाटल्याचे होनराव म्हणाल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना या विशेष अधिवेशनात हे विधेयक मंजूर करून घेऊन येणाऱ्या २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये महिलांनाही संसद- विधिमंडळात ३३ टक्के आरक्षणा देऊन नारीशक्तीचा सन्मान करायचा होता. या विधेयकाचा लाभ देशातील सर्वच राजकीय पक्षात कार्यरत असणाऱ्या आमच्या महिला भगिनींना होणार आहे. महिलांचा हक्क डावलण्याचा प्रयत्न या माध्यमातून झाला असला तरी आपण महिलांच्या हक्कासाठी येणाऱ्या काळात झगडत राहू.वर्ष २०४७ सालचा विकसित भारत महिलांच्या हक्क व अधिकारांनी परिपूर्ण असलेला पाहायला मिळेल,असा विश्वासही प्रेरणा होनराव यांनी व्यक्त केला. २०११ सालच्या जनगणनेनुसार हे विधेयक मंजूर करून घेऊन येणाऱ्या २०२९ च्या निवडणुकीपासून माता – भगिनींना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला. मतदार संघांची पुनर्रचना होऊन या विधेयकामुळे सर्वसामान्यांना समसमान लोकप्रतिनिधी मिळणार आहेत. येणाऱ्या काळात यासाठी भाजप आंदोलन करणार असल्याचे प्रेरणा होनराव यांनी नमूद केले.

लातूर शहर जिल्हा महिला भाजपच्या अध्यक्षा शीतल मालू, सरचिटणीस रागिणी यादव यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी नगरसेविका शोभा मिरचे, स्वाती घोरपडे, जयश्री मोतीपवळे , चेवले, शोभा कोंडेकर यांची उपस्थिती होती.

## प्रा. नाजेमा शेख आदर्श गुरुगौरव पुरस्काराने सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूरने गुरूवार दि. २३ एप्रिल २०२६ रोजी दयानंद सभागृह येथे प्रा. नाजेमा अब्बास शेख यांना आदर्श शिक्षक गुरुगौरव पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी व्यासपीठावर सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आ. विक्रम काळे, सह शिक्षक परिषदेचे राज्यस्तरीय जिल्हा स्तरीय पदाधिकारी यांची उपस्थिती होती.




प्रा. नाजेमा शेख यांचा सन्मान हा त्यांच्या शिक्षणातील उत्कृष्ट योगदान, विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा आणि समाजाभिमुख कार्य यांची दखल घेऊन देण्यात आला आहे. त्यांच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन केले आहे. या पुरस्काराचे श्रेय प्रा. नाजेमा शेख यांनी शाळेतील संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी, सहकारी, विद्यार्थी यांना दिले असून हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या सन्मानामुळे त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बसवेश्वर हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा भावस्पर्शी सोहळा

## तब्बल ४६ वर्षांनी वर्गमित्रांची झाली गळाभेट!





**लातूर/प्रतिनिधी :** काळ पुढे सरकत जातो, आयुष्याच्या वाटा बदलतात, पण शाळेच्या दिवसांतील आठवणी कधीच पुसल्या जात नाहीत. अशाच आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देणारा आणि भावनांनी ओथंबलेला स्नेहसंमेलन सोहळा श्री. बसवेश्वर हायस्कूल, जेवळी येथे नुकताच अत्यंत उत्साहात संपन्न झाला. १९६९ साली पहिलीत प्रवेश घेतलेल्या आणि १९७९ साली दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा हा मेळावा तब्बल ४६ वर्षांनंतर घडून आला, ज्यामध्ये जुन्या वर्गमित्रांची झालेली गळाभेट सर्वांच्या हृदयाला स्पर्श करून गेली.

या ऐतिहासिक सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालय, लातूरचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर व इतर देवतांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ. शिवाजी गायकवाड भावोद्गार काढताना म्हणाले की, स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने आम्ही वर्गमित्र जवळपास ४६ वर्षांनंतर एकत्र आलो, याचा मनस्वी आनंद झाला. आम्ही वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असलो तरी शाळेच्या आठवणी विसरणे अशक्य आहे. या शाळेमुळे व गुरुजनांमुळेच आम्ही घडलो.

यावेळी १९७९-बॅचमधील हयातीत नसलेल्या २० विद्यार्थ्यांच्या तसेच २६ दिवंगत गुरुजनांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मनोगतामध्ये श्री. श्रीशैल चिनगुंडे, श्री. एस. पी. हक्के, लता ब्रह्मानंद पाटील, साधना कुलकर्णी, उल्का कुलकर्णी, छाया कुलकर्णी आणि कस्तुराबाई कारभारी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी शालेय जीवनातील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि त्या काळातील संस्कारांमुळेच आज आम्ही जीवनाच्या विविध क्षेत्रांत यशस्वी झालो आहोत, असे सांगत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. 'तू अजूनही तसाच आहेस' अशा गमतीदार संवादांमुळे वातावरणात हास्यकल्लोळ उडाला. प्रशालेचे विद्यमान पर्यवेक्षक श्री. आर. व्ही. पाटील यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले, तर विद्यमान संचालक श्री.बाबूराव ढोबळे यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या प्रगतीसाठी व शैक्षणिक सुविधांच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित केले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून नियोजन सुरू होते. जुन्या मित्रांना शोधून एकत्र आणण्यासाठी आणि कार्यक्रमाचे उत्तम व्यवस्थापन करण्यासाठी श्री. सुभाष साळुंके, श्रीशैल चिनगुंडे, राजू पाटील (मुदगड), परमेश्वर वाकडे, विलास तळवार, मल्लिनाथ इंडे (सास्तूर), मल्लिनाथ गाडेकर, कस्तुराबाई कारभारी, साधना कुलकर्णी, छाया कुलकर्णी आणि उल्का कुलकर्णी व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यांच्या नियोजनामुळेच हा ऐतिहासिक क्षण अविस्मरणीय व रंगतदार झाला. शेवटी. ४६ वर्षांनंतर एकत्र आलेल्या या मित्रमंडळींनी केवळ भूतकाळाचा आनंद घेतला नाही, तर भविष्यातही हे ऋणानुबंध कायम ठेवण्याचा संकल्प केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. वैजिनाथ पाटील यांनी केले, तर श्री. आर. व्ही. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## बिराजदार सुनीता माधवराव यांना पीएच. डी. पदवी प्रदान



**अजगर मजकुरी/ नळेगाव :** श्री शंकर विद्यालय आटोळा ता. चाकूर जि. लातूर येथे कार्यरत असलेल्या माध्यमिक शिक्षिका श्रीमती बिराजदार सुनीता माधवराव यांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने दि. १७ एप्रिल २०२६ रोजी शिक्षणशास्त्र विषयातून पीएच. डी. पदवी प्रदान केली.

संशोधन मार्गदर्शक डॉ. संघमित्रा नारायणराव गोणारकर यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील किशोरी उत्कर्ष मंचच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास या विषयावर त्यांनी आपले संशोधन कार्य पूर्ण करून संशोधन प्रबंध विद्यापीठात सादर केला.

या त्यांच्या यशाबद्दल आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, बाह्यपरीक्षक डॉ. ज्ञानेश्वर मानेराव, शिक्षणशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. वैजयंता पाटील, डॉ. अशोक गिणगिणे, डॉ. भीमा केंगले, डॉ. सिंकू कुमार सिंह, डॉ. सुनीता पाटील, डॉ. महेश जोशी, श्री एम. एस. बिराजदार, श्री अभिराम पाटील, श्री वसंतराव भडके, श्री गणपतराव गंगापुरे, श्री नरेंद्र कुलकर्णी, श्री पापा गंगापूरे, श्री गोविंद बिराजदार, श्रीमती शिवाबाई बिराजदार, मुख्याध्यापक श्री महादेव बोळेगावे व सर्व शिक्षक वृंद तसेच श्री विश्वनाथ सताळकर, श्री उमाकांत मळभागे, श्री बब्रुवान जाधव, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, श्री लक्ष्मण दावणकर डॉ. उमाकांत किडीले, शेटे अक्षर दिलीप, निशिकांत मिरकले, डॉ. बालाजी संमुखराव डॉ. शेषेराव बिराजदार, डॉ. लोणारे कीर्तीराज, डॉ. सातपुते सतीश, डॉ. कदम मारुती, भगवान केंद्रे, तुकाराम पालमटे, डॉ. नागेश पाटील, डॉ. स्मिता मामीलवाड यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

अभ्यासातील व संशोधन कार्यातील सातत्य, परिश्रम व कष्टाच्या जोरावर त्यांनी मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल सर्व शिक्षक वृंद, सहकारी बंधू-भगिनी,शिक्षण प्रेमी व विद्यार्थी तसेच पालक वर्ग या सर्व स्तरातून डॉ. बिराजदार सुनीता माधवराव यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्याची उत्साहात सुरुवात



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्याची मोठया उत्साहात सुरवात करण्यात आली.

सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाची सुरवात प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये जल शपथ घेऊन पाणी वाचवण्याचा संकल्प करून केली. शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षिका, शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी यांनी जलशक्ती पंधरवड्याच्या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी शाळांमध्ये प्रार्थना सभेच्या वेळी पाणी जपून वापरण्याची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमामागील शाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचतीची सवय लावणे हा आहे.

यानिमित्ताने शाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, याचबरोबर कृतीशील उपक्रम सुद्धा राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना दररोज त्यांनी घरी पाण्याचा वापर कसा कमी केला याची नोंद ठेवण्यास सांगितले आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी संपूर्ण कुटुंबाला सहभागी करून घ्यायचे आहे.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यासोबत शाळेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा व कुटुंबाचा सहभाग असणार आहे.

## सोलार स्टार्टर चोरी करताना चोरटा रंगेहाथ सापडला; पोलिसांनी रात्रभर गुन्हेगाराला शेतकऱ्यांकडेच ठेवले

**निलंगा/प्रतिनिधी :** निटूर परिसरातील गौर शिवारात सोलार पंपाचे स्टार्टर चोरताना शेतकऱ्यांनी चोरट्यांना रंगेहाथ पकडल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. या घटनेत एक चोरटा शेतकऱ्यांच्या ताब्यात सापडला, तर त्याचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेत पळून जाण्यात यशस्वी झाले. पकडलेल्या चोरट्याला शेतकऱ्यांनी निलंगा पोलिस ठाण्यात नेऊन दिले; मात्र पोलिसांनी त्याला कोठडीत न ठेवता पुन्हा शेतकऱ्यांच्याच स्वाधीन केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

गौर शिवारात गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास काही अज्ञात व्यक्ती सोलार पंपाचे स्टार्टर चोरत असल्याची माहिती स्थानिक शेतकऱ्यांना मिळाली. ही माहिती मिळताच शेतकरी हरिदास साळुंके, सोमनाथ शेळके आणि राजेंद्र चामे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. शेतकऱ्यांनी धाडसाने त्यांचा पाठलाग करत एकाला पकडले. मात्र त्याचे दोघे साथीदार अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाले. संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी पकडलेल्या चोरट्याला चोप देत त्याला चारचाकी वाहनातून निलंगा पोलिस ठाण्यात नेले.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पोलिसांनी त्या चौकशी करून त्याला अटक करण्याऐवजी पुन्हा शेतकऱ्यांच्या ताब्यात दिले. त्या चोरट्याला रात्रीचे जेवण देऊन झोपण्यासाठीही व्यवस्था करावी लागल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. निटूर परिसरातचोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी मुगाव येथेही अशीच चोरी झाली होती. त्यांनी तक्रार दिल्यानंतर गुन्हाही दाखल करण्यात आला होता. सदरील आरोपीला रंगे हाथ पकडून निलंगा पोलिसांत दिले मात्र पोलिसांनी शुक्रवारी दुपारपर्यंत गुन्हा दाखल केला नव्हता असे समजते.

### पालक मंत्री ..

रोटेशन पध्दतीने  
पालक मंत्री नेमा  
नवी कल्पना पहा  
सगळे लागे कामा

सारेअसे ऑलवेल  
जनतेस करे मामा  
भरकटली समस्या  
कुणांस नाही तमा

आंत मीठाचे खडे  
वर साखर मुलामा  
ऐट दाखवेराजाची  
ओळखतो गुलामा

संख्याबळ प्रदर्शन  
घेऊफिरे लवाजमा  
कधी करे जनसेवा  
पुण्यमुळी नसेजमा

काही हवी गडबडी  
पाहवत नसेअधमा  
स्पष्ट निर्णय घेऊन  
दूर करायचे संभ्रमा

शांततेपाहतेजनता  
पुनः न करेलं क्षमा  
ताळेवर आणे सर्वां  
निवडून देई सक्षमा

पदमिळते मुश्किले  
सांभाळावी गरिमा  
जनसेवा एक अस्त्र  
जळाळे पुनःअर्यमा

**– हेमंत मुसरीफ पुणे.**  
९७३०३०६९९६

# अवैध गुटखा व तंबाखूविरोधात लातूर पोलिसांची जिल्हाभर धडक कारवाई

## एकाच वेळी छापेमारी; ११ गुन्हे दाखल, ८ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदेशीर साठवणुकीविरुद्ध लातूर पोलीस दलाने एकाच वेळी संपूर्ण जिल्हाभर अचानक धाडसत्र आयोजित करून मोठी कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर ही मोहीम राबविण्यात आली. या धडक कारवाईदरम्यान जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या पथकांनी अहमदपूर, रेणापुर, औराद शहाजनी, मुरुड, निलंगा, भादा, औसा, निलंगा, उदगीर शहर व उदगीर ग्रामीण या ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली.

दि. २३/०४/२०२६ रोजी एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून, यामध्ये गुटखा विक्री, COPT-कायद्याचे उल्लंघन तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत गुन्ह्यांचा समावेश आहे. सदर मोहिमेंतर्गत प्रतिबंधित गुटखा तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री व्यवसाय केले संदर्भात पोलीस ठाणे अहमदपूर, उदगीर शहर व उदगीर ग्रामीण येथे प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस ठाणे रेणापूर येथे स्थानिक गुन्हे शाखेकडून एक व पोलीस पोलीस ठाण्याच्या वतीने एक असे एकूण ०५ गुटखा प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तर ०६ कारवाई उजझढ- कायद्यान्वये करण्यात आले आहेत.

या कारवाईत खालील आरोपींविरुद्ध गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

१) औराद शहाजनीं पोलीस ठाणे – संदीप. वय ३४, राहणार लिंगायत गल्ली, औराद शहाजनी

२) मुरुड पोलीस ठाणे – सुरज, वय ३६ वर्षे राहणार न्यू कॉलनी मुरुड.

३) उदगीर शहर पोलीस ठाणे – यश वय अठरा वर्षे राहणार विजयनगर बिदर नाका उदगीर (अटक)

४) पोलीस ठाणे निलंगा बाबूराव वय ७० वर्षे राहणार झरी तालुका निलंगा.

५) अहमदपूर पोलीस ठाणे – शंकर वय ६० वर्षे राहणार कुमठा तालुका अहमदपूर (अटक), अमजद बैदे (फरार)

६) उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे – बालाजी, वय ४०, लखमापूर, ता. रेणापूर

७) रेणापुर पोलीस ठाणे – विकास पाटील वय २७ वर्षे राहणार पाटील गल्ली, रेणापूर(अटक)

८)पोलीस ठाणे रेणापूर अमर, राहणार बोरवटी तालुका लातूर.(अटक)

९) भादा पोलीस ठाणे – अमोल, वय ३८ वर्षे राहणार उजनी तालुका औसा

१०) भादा पोलीस ठाणे – सुरेश

११) औसा पोलीस ठाणे – सरफराज, वय २७ वर्षे राहणार खंदक गल्ली, औसा (इतर संबंधित आरोपींचा शोध सुरू आहे)

सदर कारवायांमध्ये आरोपींकडून ८,९७,१५२ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधीत पान मसाला, तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट जप्त करण्यात आले आहे.

ही कारवाई कोटपा अधिनियम २००३, भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत करण्यात आली असून, विशेषतः शाळा परिसरात व सार्वजनिक ठिकाणी अल्पवयीनांना तंबाखू विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे.सदर गुन्ह्यांमध्ये काही आरोपींना अटक करण्यात आली असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे. सर्व प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांचे अधिकारी करत आहेत.

पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी सांगितले की, समाजाच्या आरोग्याशी संबंधित अशा गंभीर बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध कारवाई अधिक तीव्र करण्यात येईल. तर मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांनी नागरिकांना आवाहन केले की, अशा बेकायदेशीर कृत्यांची माहिती तात्काळ पोलीसांना द्यावी व प्रशासनाला सहकार्य करावे. लातूर पोलीस दल समाजहित व सार्वजनिक आरोग्य जपण्यासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही अशा प्रकारच्या धडक कारवाया सातत्याने राबविण्यात येणार आहेत.


**मध्य रेल्वे**  
**सोलापूर विभाग**  
**सिग्नलिंग प्रणालीची तरतूद**  
निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-04  
दिनांक: २२.०४.२०२६

डीआरएम (S&T) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांकरिता सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत:- **कामाचे नाव व ठिकाण:** लातूर स्थानकावर सुरक्षा व वाहतूक प्रवाहामध्ये सुधारणा करण्यासाठी सिग्नलिंग प्रणालीची तरतूद; तसेच मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात वर्धित सुरक्षा व कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी, पाणी साचणाऱ्या, चिखलाने भरलेल्या किंवा गाळ साचलेल्या ट्रॅक सर्किट्ससारख्या संवेदनशील ठिकाणी 'DAC' ची तरतूद. **निविदा क्र.:** SUR-N-T-2026-27-04, **कामाचा अंदाजित खर्च:** रु. ३,२९,०३,२६२.०४, **निविदा अर्जाचा खर्च:** शून्य, **जमा करावयाची अनामत रक्कम:** रु. ६,५८,१००/-, **कामाचा पूर्तता कालावधी:** १२ महिने, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** १५.०५.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल हस्तलिखित, टपालाद्वारे, ई-मेलद्वारे, फॅक्सद्वारे किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा मबँक गॅरंटीफ या माध्यमांचा स्वीकार केला जाईल; तथापि, मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष हस्ताने जमा करणे अनिवार्य आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक, S&T शाखा  
DE/Sur-23 मध्य रेल्वे, सोलापूर

सुरक्षित प्रवास करा,  
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-  
मास्टरप्लेट  
ट्रेसिंग क्वालिटी  
संपर्क  
8600025070  
9028376965  
प्रिंटर्स पॅराडाईस  
प्रिंटर रिपेअरिंग  
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस  
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र  
सितारी विमा सेवा केंद्र  
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.  
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत  
जमीरोद्दीन सितारी  
चेअरमन क्लक मेंबर CLIA  
एजंट भरती चालू आहे.  
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.  
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६